एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
१०४ शतकोत्तर वाटचाल
• पुणे, बुधवार १३ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२३३, पाने-८, किंमत: ₹ ७
NAVAKAL
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 233 Marathi - Daily - Pune, 13 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
navakal.in
१९६७ ची पुनरावृत्ती? नक्की गोंधळ काय?
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### नसरापूर अत्याचार प्रकरण सुनावणीसाठी विशेष न्यायालय

**पुणे** - पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील अत्याचार व हत्या प्रकरणाची जलदगतीने सुनावणी करण्यासाठी विशेष न्यायालय स्थापन करण्याचा अध्यादेश काढण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आणि राज्यपालांच्या मान्यतेनंतर हे आदेश निर्गमित देण्यात आले आहेत. नसरापूर प्रकरणाच्या तपासासाठी पुणे ग्रामीण पोलीस यांनी आधीच विशेष तपास पथक स्थापन केले आहे. विशेष सरकारी वकील म्हणून अजय मिसर यांची नियुक्ती केली आहे. त्यानंतर या प्रकरणाची सुनावणी प्रभावी आणि जलदगतीने पार पाडण्यासाठी शासनाने हे तिसरे पाऊल उचलले आहे.

### तीन दिवस उष्णतेची लाट उष्माघाताचा धोका वाढला

**पुणे** - महाराष्ट्रात पुढील ३ दिवस उष्णतेची लाट येणार आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यामध्ये उच्चांकी तापमान वाढणार असून पुढील ३ दिवसांत राज्यात उष्माघाताचा धोका वाढला आहे, अशी माहिती पुणे हवामान विभागाचे तज्ज्ञ सखाराम सानप यांनी दिली. उष्माघातामुळे



रुग्णसंख्या वाढण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. महाराष्ट्र उन्हाने तापला आहे, पुढील तीन दिवस सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या बहुतांश जिल्ह्यांना उष्णतेचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. अकोला आणि नंदुरबार जिल्ह्याचे तापमान ४५.३ अंशाच्या पुढे गेले आहे. राज्याच्या कमाल तापमानात पुढील चार दिवसांत आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यामध्ये नागरिकांना उष्म्याचा सामना करावा लागणार आहे. अकोला आणि नंदुरबार जिल्ह्याचे तापमान ४५.३ अंशाच्या पुढे गेले आहे.

# पेपरफुटीच्या आरोपामुळे यंदाची नीट परीक्षा रद्द
# देशभरातील विद्यार्थी संतापले! सीबीआय चौकशी करणार

**वैद्यकीय प्रवेशांसाठी ३ मे रोजी घेतल्या गेलेल्या नीट परीक्षेचा पेपर फुटला होता हे उघड झाल्याने आज ही परीक्षाच रद्द केल्याचे जाहीर करण्यात आले. आता ही परीक्षा पुन्हा घेतली जाणार आहे. ही माहिती येताच नीटची परीक्षा दिलेले देशभरातील लाखो विद्यार्थी संतापले. दिल्लीत काँग्रेसच्या विद्यार्थी संघटनांनी रस्त्यावर उतरून सरकारच्या विरोधात आंदोलन केले. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्याचाच हा प्रकार सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला.**




### आठ वर्षांत १६ वेळा परीक्षा रद्द

देशातील प्रमुख प्रवेश परीक्षा घेणारी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) २०१८ मध्ये स्थापन केली. शिक्षण मंत्रालयाअंतर्गत कार्यरत असलेली ही संस्था देशातील प्रवेश परीक्षा अधिक पारदर्शक आणि एकसमान पद्धतीने घेण्यासाठी स्थापन करण्यात आली. मात्र गेल्या आठ वर्षांत १६ वेळा परीक्षा रद्द किंवा पुढे ढकलावी लागली आहे, अशी माहिती केंद्र सरकारनेच लोकसभेत दिली होती. कोविड काळात जेईई मेन २०२०, नीट-यूजी २०२०, जेईई मेन २०२१ आणि नीट-यूजी २०२१ या परीक्षांना फटका बसला. त्याचप्रमाणे सीएसआयआर-यूजीसी नेट २०२०, यूजीसी-नेट डिसेंबर २०२०, यूजीसी-नेट मे २०२१ आणि आयसीएआर एआयईईए २०२० या परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या. डीयूईटी २०२० ही परीक्षा नोंदणीतील अडचणींमुळे स्थगित करण्यात आली, तर सीमॅट २०२१ परीक्षा पॅटर्नमधील बदलांमुळे पुढे ढकलली. याशिवाय एआयएपीजीईटी २०२१ आणि जिपमॅट २०२१ या परीक्षा कोविडमुळे, आयजीएनओयू पीएचडी प्रवेश परीक्षा २०२२ प्रशासकीय कारणांमुळे व जीएटी-बी २०२३ परीक्षा तांत्रिक कारणांसाठी स्थगित झाली. २०२४ मध्ये एनसीईटी परीक्षा तांत्रिक कारणांमुळे आणि सीएसआयआर-नेट परीक्षा लॉजिस्टिक कारणांमुळे पुढे ढकलावी लागली.

■ नवी दिल्ली

**ही परीक्षा** पुन्हा घेतली जाणार आहे. लवकरच या परीक्षेची नवी तारीख जाहीर करण्यात येईल. या प्रकरणाची सीबीआय चौकशीही होईल, असे ही परीक्षा घेणाऱ्या एनटीएने(नॅशनल टेस्टिंग एजन्सी) केली आहे. २०२४ मध्येही नीट परीक्षेत पेपरफुटीचा प्रकार घडला होता. मात्र चौकशीनंतर पेपरफुटीचा प्रकार देशव्यापी नव्हता, असा निष्कर्ष काढण्यात आला. कुणावरही कारवाई झाली नाही. मात्र यावर्षी पेपरफुटी झाली आणि परिणामी परीक्षा रद्द करण्याची वेळ आली.

रद्द झालेली ही परीक्षा पुन्हा घेतली जाणार असून नवीन तारखा आणि प्रवेशपत्रांबाबतची माहिती लवकरच अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केली जाणार आहे. मे २०२६ सत्रासाठी केलेली » पान ५ वर

## भाजपाने काँग्रेसला सत्तेवरून खेचायला अण्णाद्रमुक पक्ष उभा फोडला



**तामिळनाडूच्या राजकारणात आज मोठी उलथापालथ झाली. दिवंगत एम.जी.रामचंद्रन आणि त्यानंतर जयललिता यांच्या अण्णा द्रमुक पक्षात उभी फूट पडली असून ४७ पैकी ३० सदस्यांच्या गटाने विजय थलापती यांच्या टीव्हीके सरकारला जाहीर पाठिंबा दिला आहे. अण्णा द्रमुक हा भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील (एनडीए) घटक पक्ष आहे. ही फोडाफोड काँग्रेसला सत्तेबाहेर काढण्यासाठी भाजपाने रचलेले कारस्थान आहे, असे म्हटले जाते आहे.**

■ चेन्नई

**महाराष्ट्रात** एकनाथ शिंदे यांना हाताशी धरून शिवसेनेत जशी फूट पाडली तसाच प्रयोग भाजपाने तामिळनाडूमध्ये अण्णा द्रमुक या मित्रपक्षाशी केला. पक्षाचे ज्येष्ठ नेते एस. पी. वेलुमणी आणि सी. व्ही. षण्मुगम यांच्या नेतृत्वाखालील ३० आमदारांचा गट बाहेर पडला. या गटाने विजय यांच्या टीव्हीके सरकारला पाठिंबा जाहीर केला. हा पाठिंबा मिळाल्याने विजय यांना आता ५ आमदार असलेल्या काँग्रेसची आणि दोन आमदार असलेल्या डाव्या पक्षांची मुळीच गरज उरलेली नाही. त्यामुळे विजय कधीही काँग्रेस आणि डाव्यांना बाहेरचा रस्ता दाखवतील अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. काँग्रेसला बाहेर काढण्यासाठीच भाजपाने ही खेळी केली आहे.

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत माजी मुख्यमंत्री एम.के.स्टॅलिन यांचा द्रमुक आणि अण्णा द्रमुक या दोन्ही पक्षांना धुडकावून लावत तामिळी जनतेने विजय यांच्या टीव्हीके पक्षाला भरभरून मतदान केले. त्या जोरावर टीव्हीके १०८ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष बनला. मतदानाचा निकाल जाहीर होत असताना सर्वप्रथम काँग्रेसने टीव्हीकेला पाठिंबा जाहीर केला. खरेतर स्टॅलिन यांचा द्रमुक हा काँग्रेससोबत इंडिया आघाडीत होता. तरीही काँग्रेसने द्रमुकला न जुमानता टीव्हीकेला पाठिंबा दिला. टीव्हीके » पान ७ वर

## तुमच्या चुकांचा जनतेला भुर्दंड का? राज ठाकरे-शरद पवारांचे मोदींना पत्र



■ मुंबई

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना काटकसर करण्याचे आवाहन केल्यानंतर त्यावर राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान मोदी यांना आज पत्र लिहिले आहे. राज ठाकरे यांनी पत्रात म्हटले आहे की, काटकसरीची सुरुवात स्वतःपासून सुरू करा. चुका तुमच्या आणि त्याचा भुर्दंड जनतेला का? पंतप्रधान आता १५ मे पासून ५ देशांच्या परदेश दौऱ्यावर निघालेत, हे दौरे तुम्ही थांबवा आणि मग लोकांना आवाहन करा. तर शरद पवार यांनी पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी केली आहे.

शरद पवार यांनी पत्रात म्हटले आहे की, मध्यपूर्वेतील अस्थिर आणि युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी दोन दिवसांपूर्वी काही घोषणा केल्या. त्यांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम

राज ठाकरेंचे सविस्तर पत्र पान८ वर

होण्याची शक्यता आहे. या घोषणा अचानक करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिक, उद्योग-व्यवसाय क्षेत्र तसेच गुंतवणुकदारांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ही बाब निश्चितच काळजी निर्माण करणारी आहे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पंतप्रधानांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक आयोजित करावी. राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांवर सर्वपक्षीय नेत्यांना विश्वासात घेऊन निर्णय-प्रक्रिया राबविणे देशहितासाठी अत्यंत आवश्यक आहे. सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेता केंद्र सरकारने अधिक संवेदनशीलता आणि व्यापक सल्लामसलत यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. यासोबतच पंतप्रधानांनी देशातील नामवंत अर्थतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि संबंधित तज्ज्ञांची तातडीने बैठक बोलावून परिस्थितीचा सखोल आढावा घ्यावा. पुढील धोरणांबाबत व्यापक विचारविनिमय करावा. देशातील जनतेमध्ये विश्वास आणि स्थैर्य निर्माण करणे, यालाच सद्यस्थितीत सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, अशी आमची ठाम भूमिका आहे.

## सुधारित पेन्शन योजनेत त्रुटी महासंघाची मुख्यमंत्र्यांसोबत बैठक

■ मुंबई

**मुंबई** येथे राज्य सरकारने ६ मे रोजी जाहीर केलेल्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन (पेन्शन) योजनेच्या शासन निर्णयात अनेक तांत्रिक व कायदेशीर त्रुटी असल्याचा दावा करण्यात आला आहे. या त्रुटी दूर करण्यासाठी तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य सचिवांसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेणार आहे.

महासंघाने सर्व संलग्न संघटना, जिल्हा समन्वय समित्या आणि प्रतिनिधींना संबंधित शासन निर्णयाचा सखोल अभ्यास करून लेखी सूचना पाठवण्याचे आवाहन » पान ७ वर

## राष्ट्रवादी यादीत पटेल-तटकरे नाहीत क्लेरिकल चूक! सुनेत्रा पवारांचे स्पष्टीकरण

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या नव्या यादीवरून राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. निवडणूक आयोगाला सादर केलेल्या यादीत पक्षातील ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि छगन भुजबळ यांची नावे गायब झाल्याने चर्चेला उधाण आले आहे.



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

२९ एप्रिलला आयोगाकडे सादर केलेल्या यादीत सुनेत्रा पवार यांचा राष्ट्रीय अध्यक्षा म्हणून उल्लेख असून, सरचिटणीस म्हणून पार्थ पवार आणि जय पवार यांच्या नावांचा समावेश आहे. दीर्घकाळ पक्षाचा राष्ट्रीय चेहरा राहिलेले प्रफुल्ल पटेल यांचे नाव नसणे राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. यावरून आश्चर्य व्यक्त होताच पक्षाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी एक्स पोस्ट करत स्पष्टीकरण दिले की, माध्यमांमध्ये प्रसारित होत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या यादीत एक तांत्रिक आणि क्लेरिकल चूक झाली आहे. ही चूक लवकरच दुरुस्त केली जाईल.

## श्रीनिवासन, विजय सिंह यांच्या विरोधात नोएल टाटांचे मतदान

■ नवी दिल्ली

**टाटा** उद्योग समूहातील विविध ट्रस्टवरील विश्वस्त आणि संचालक पदांवरून गेले काही दिवस अनेक घडामोडी होत आहेत. याच मालिकेतील नवी घडामोड म्हणजे टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी टाटा एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्टवर (टीईडीटी) वेणु श्रीनिवासन आणि विजय सिंह यांच्या फेरनियुक्तीच्या विरोधात मतदान केले. श्रीनिवासन आणि सिंह या टीईडीटीचे विश्वस्त म्हणून कार्यकाळ संपत आला आहे. त्यामुळे त्यांच्या फेरनिवडीचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. हा प्रस्ताव ट्रस्टच्या नियमानुसार एकमताने मंजूर होणे आवश्यक आहे. मतदानाच्या मुदतीच्या शेवटच्या दिवशी रविवारी नोएल टाटा यांनी विरोधात मतदान केले. त्यामुळे आता श्रीनिवासन आणि सिंह यांना टीईडीटीवरून पायउतार व्हावे लागणार आहे. या घडामोडीला विशेष महत्त्व आहे कारण नोएल टाटा हे याआधी कधीही ज्येष्ठ सदस्यांच्या विरोधात गेले नव्हते.

## आयटी क्षेत्र पुन्हा 'वर्क फ्रॉम होम'कडे ऊर्जा बचतीसाठी कंपन्यांचा निर्णय

■ नवी दिल्ली

**पश्चिम** आशियातील वाढत्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना ऊर्जा बचतीसाठी आवाहन केले आहे. त्यानंतर भारतातील माहिती-तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्राने पुन्हा एकदा 'वर्क फ्रॉम होम' व 'हायब्रिड' कामकाज पद्धतीकडे वळण्याचा निर्णय घेतला आहे. ऊर्जा बचत व कार्यक्षम व्यवस्थापन यासाठी आयटी कंपन्या सावध भूमिका घेत असल्याची माहिती नॅसकॉमने दिली.

सुमारे ३,५०० सदस्य कंपन्यांचे प्रतिनिधित्व करणारी 'नॅसकॉम' ही संस्था ३१५ अब्ज डॉलरच्या भारतीय तंत्रज्ञान उद्योगाचे प्रतिनिधित्व करते. 'नॅसकॉम'ने स्पष्ट केले की, आखातातील परिस्थिती सतत बदलत असल्याने त्यावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. या पार्श्वभूमीवर अनेक कंपन्यांनी आपल्या कॅम्पसमध्ये ऊर्जा वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी



कडक उपाययोजना सुरू केल्या आहेत. अनावश्यक वीज वापर टाळणे, काही सुविधा मर्यादित ठेवणे आणि शक्य तेथे कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची परवानगी देणे, अशा उपायांचा अवलंब केला जात आहे.

## देशात तेल-गॅसची टंचाई नाही पेट्रोलियम मंत्र्यांची ग्वाही

■ नवी दिल्ली



**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनानंतर देशात निर्माण झालेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदिप सिंह पुरी यांनी आज पुन्हा एकदा देशात तेल टंचाई नाही, अशी ग्वाही दिली. मध्य पूर्वेतील युद्धामुळे भारतासह संपूर्ण जग तेल संकटाचा सामना करत आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी रविवारी एका जाहीर सभेत बोलताना जनतेला पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचे आवाहन केले. मोदींच्या या आवाहनानंतर देशात गोंधळ माजला. आज राजधानी दिल्लीत आयोजित भारतीय उद्योजकांच्या वार्षिक परिषदेत बोलताना पुरी यांनी जनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न केला. देशाच्या तेल पुरवठ्यासमोर कोणतेही संकट नाही. पुरवठा सुरळीत सुरू आहे. आपल्याकडे ६९ दिवस पुरेल एवढे कच्चे तेल, पुरेसा नैसर्गिक वायू आणि ४५ दिवस पुरेल एवढा एलपीजी साठा उपलब्ध आहे.

## सरमा यांनी दुसऱ्यांदा आसामच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली

■ गुवाहाटी

**आसाममध्ये** हिमंता बिस्वा सरमा यांनी आज सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. ही किमया साधणारे सरमा हे पहिलेच बिगर काँग्रेस नेते ठरले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी आदि नेते सरमा यांच्या शपथग्रहण समारंभाला उपस्थित होते. महाराष्ट्रातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी उपस्थिती लावली होती.

राजधानी गुवाहाटीच्या खानापारा व्हेटरनरी ग्राऊंडवर आयोजित समारंभात राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी पद आणि गोपनियतेची शपथ दिली. सरमा यांच्याबरोबरच आज अन्य चार मंत्र्यांना शपथ देण्यात आली. त्यामध्ये



रामेश्वर तेली आणि अनंता नेओग हे दोन भाजपाचे तर आसाम गण परिषदचे अतुल बोरा आणि बोडोलँड पिपल्स फ्रंटचे चरण बोरो यांचा समावेश आहे.

तेली हे माजी केंद्रीय मंत्री आहेत. तर नेओग हे आधीच्या सरकारमध्ये अर्थमंत्री होते.

## एक महिन्यात मराठी पाट्या लावा पालिकेकडून पुन्हा एकदा नवी मुदत

**मराठी पाट्यांच्या अंमलबजावणीबाबत मुंबई महानगरपालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. शहरातील सर्व दुकाने, आस्थापने आणि कार्यालयांना मराठी भाषेत फलक लावण्यासाठी एक महिन्याची मुदत दिली आहे. या मुदतीनंतरही मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानांवर थेट बंदची कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे.**



■ मुंबई

**मराठी** पाट्यांसाठी उद्यापासूनच पालिकेकडून झाडाझडती मोहीम सुरू होणार आहे. नोटिसा बजावणे आणि सक्त निर्देश देण्याची प्रक्रिया हाती घेतली जाणार आहे. मार्च २०२२ मध्ये राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दुकाने, आस्थापने आणि कार्यालयांवरील नामफलक मराठी भाषेत आणि ठळक अक्षरात असणे बंधनकारक करण्यात आले. याआधी २०१८ च्या निर्णयानुसार दहा किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या दुकानांनाच ही अट लागू होती. मात्र नव्या निर्णयानुसार कर्मचारी संख्या कितीही » पान ७ वर

## अग्निवीरांना सैनिकांप्रमाणे पेन्शन लाभांवर दावा करता येणार नाही

■ मुंबई

**अग्निवीर** आणि लष्करातील नियमित सैनिक यांचा दर्जा समान नाही. त्यामुळे सेवेत असताना मरण आल्यास



अग्निवीराचे कुटुंबीय नियमित सैनिकांप्रमाणे निवृत्ती वेतनासंबंधीच्या लाभांसाठी दावा करू शकत नाहीत, अशी भूमिका केंद्र सरकारच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात शपथपत्रावर मांडण्यात आली.

ऑपरेशन सिंदूरदरम्यान जम्मू आणि काश्मीरमध्ये सीमेपलिकडून झालेल्या बॉम्बहल्ल्यात मरण पावलेले अग्निवीर मुरली नाईक यांच्या आई ज्योतिबाई नाईक यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. नियमित शहीद सैनिकांच्या कुटुंबियांना दिले जातात तसेच लाभ मिळावेत, अशी विनंती ज्योतिबाई नाईक यांनी केली होती. या याचिकेवर भूमिका मांडताना केंद्र सरकारच्या वतीने हे शपथपत्र दाखल करण्यात आले आहे.

ॲड. संदेश मोरे, ॲड. हेमंत घाडीगावकर आणि ॲड. हितेंद्र गांधी यांनी ज्योतिबाई » पान ७ वर

# इंडिया आघाडीत समन्वयाचा अभाव



**पश्चिम बंगाल, केरळ आणि तामिळनाडूमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी सत्ता परिवर्तनाचा जनादेश दिला. पश्चिम बंगालमध्ये पंधरा वर्षे भक्कम असलेला ममता बॅनर्जींचा गड भाजपाच्या त्सुनामीत कोसळला आणि तिथे सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे पहिले सरकार स्थापन झाले. केरळमध्ये पिनराइ विजयन यांच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्टांचे सरकार पडले आणि काँग्रेसप्रणित आघाडीचा सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाला. आसाममध्ये भाजपाने सत्ता स्थापनेची हॅटट्रीक केली. तामिळनाडूत मतदारांनी द्रमुक व अण्णा द्रमुक या दोन्ही द्रविड पक्षांना नाकारले व सुपरस्टार अभिनेता सी जोसेफ विजय यांच्या टीव्हीके पक्षाचे सर्वाधिक १०८ आमदार निवडून आले. पुद्दुचेरीत भाजपाने सत्ता कायम राखली. लोकसभेत शंभर खासदार असलेल्या काँग्रेस पक्षाला केरळच्या विजयाने दिलासा मिळाला.**

**गेली** तीन टर्म काँग्रेसकडे केंद्राची सत्ता नाही. देशात बावीस राज्यात भाजपाप्रणित एनएडीएचे सरकार सत्तेवर आहे. देशात अठरा मुख्यमंत्री भाजपाचे आहेत. तरीही प्रादेशिक पक्षांना विश्वासात घेणे व इंडिया आघाडीतील मित्र पक्षांना सन्मानाने बरोबर ठेवणे हे अजून काँग्रेसला जमत नाही किंवा समजत नाही.

तामिळनाडूत द्रमुक हा काँग्रेसचा जुना दीर्घ काळ बरोबर असलेला मित्र पक्ष आहे. काँग्रेस पक्ष स्वबळावर तेथे लढू शकत नाही. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने द्रमुकबरोबर युती केली होती. काँग्रेसचा देशाच्या राजकारणात भाजपा हा नंबर १ चा राजकीय शत्रू असताना मोठे निर्णय घेताना मित्र पक्षांना विश्वासात नको का घ्यायला ? काँग्रेस व द्रमुक हे अनेक वर्षे युती करून लढत आहेत. पण तामिळनाडूत सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेसने टीव्हीकेचे प्रमुख विजय यांना परस्पर पाठिंबा देऊन टाकला. द्रमुक आणि अण्णा द्रमुक हे दोन्ही पक्ष वर्षानुवर्षे एकमेकांच्या विरोधात लढत आहेत. दोन्ही पक्षांनी विजय यांना पाठिंबा देण्यास नकार दिला. तामिळनाडूत भाजपाने अण्णा द्रमुकशी युती केली असली तरी तिथे भाजपाचा एकच आमदार निवडून आलेला आहे. सरकार स्थापनेला काहीसा विलंब झाला तरी सी. जोसेफ विजय हेच मुख्यमंत्री होणार व त्यांच्या टीव्हीके पक्षाची चेन्नईत सत्ता येणार. हे सर्वश्रुत होते. पण सत्तेत वाटा मिळविण्यासाठी विजय यांना घाईघाईने पाठिंबा देऊन काँग्रेस किती अगतिक झाली, होती, हेच दिसून आले.

काँग्रेस हा इंडिया आघाडीतील प्रमुख पक्ष आहे. लोकसभा व राज्यसभेत विरोधी पक्षनेते काँग्रेस पक्षाचे आहेत. पण काँग्रेस पक्ष पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ किंवा पंजाबमधे तेथील प्रादेशिक पक्षांशी मैत्रीचे व विश्वासाचे संबंध ठेवत नाही. त्याचा परिणाम इंडिया आघाडीवर होतो आणि विरोधी पक्ष भाजपप्रणित एनडीएसमोर कमकुवत होतो. ममता बॅनर्जी या काँग्रेसमध्ये असताना पश्चिम बंगालमध्ये डाव्या पक्षांशी आक्रमकपणे लढत असत. मात्र राज्यातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते डाव्या पक्षांशी मिनी भगत असत. त्यामुळेच ममता यांनी संतापून बंगालमध्ये एकला चलो रे भूमिका घेतली. देशपातळीवर आपण इंडिया आघाडीत आहोत पण राज्यात आम्ही एकटे लढू अशी त्यांची कायम भूमिका असते. तृणमूल काँग्रेस स्थापन केल्यापासून त्यांनी काँग्रेसचे नेतृत्व व वर्चस्व कधीच मान्य केले नाही.

पश्चिम बंगालमधे ममता व तामिळनाडूत स्टॅलिन यांचा झालेल्या पराभवानंतर इंडिया आघाडीचे भवितव्य काय हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. हे दोन्ही नेते इंडिया आघाडीचे भक्कम आधार होते. संसदेत काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुक एकत्र आले की संसदेत भाजपा सरकारला नमते घ्यावे लागते हे महिला आरक्षण विधेयकाच्या वेळी दिसून आले. सपा व द्रमुक या दोन पक्षांनी काँग्रेसला सदैव भक्कम साथ दिली आहे. तृणमूल काँग्रेस आपल्या काही मुद्यांवर विशेषतः प्रादेशिक प्रश्नावर कोणाशीही तडजोड करीत नाही हे अनेकदा घडले आहे. काँग्रेसने डाव्या पक्षांच्या आघाडीचा केरळमध्ये पराभव केला.

डॉ. सुकृत खांडेकर

तर पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसने तृणमूल काँग्रेसच्या विरोधात सर्वत्र निवडणूक लढवली. पश्चिम बंगालमध्ये राहुल गांधींनी ममता यांच्यावर अतिशय तिखट शब्दात टीका केली. निवडणुकीत केलेली टीका किंवा आरोप हे सर्व समजता येईल. मात्र तामिळनाडूत काँग्रेसने द्रमुकबरोबर युती करून निवडणूक लढवली व निकालानंतर लगेचच थेट विजय यांना पाठिंब्याचे पत्र दिले. काँग्रेसच्या या दुटप्पी भूमिकेमुळे स्टॅलिन भयंकर संतप्त झाले. सत्तेत सहभागी होण्यासाठी काँग्रेसने केलेले हे संधीसाधूपणाचे राजकारण आहे, अशी टीका द्रमुकने केली. काँग्रेस पक्ष जर विजय यांच्या सरकारमध्ये सामील झाला तर लोकसभेत द्रमुकच्या २२ खासदारांचे व राज्यसभेत द्रमुकच्या ८ खासदारांचे समर्थन काँग्रेसला कसे मिळेल? काँग्रेसच्या तामिळनाडूतील नेत्यांना स्टॅलिनबरोबर जायचे नसते. पण राहुल गांधी व सोनिया गांधींच्या आदेशामुळे तेथे युती होते, हा आजवरचा अनुभव आहे. तामिळनाडूत लोकसभेच्या ३९ जागा आहेत. जर २०२९ ची लोकसभा जिंकायची असेल तर विजय यांच्याबरोबर राहिले पाहिजे असे काँग्रेसला वाटते. विजय यांचा करिष्मा व लोकप्रियता शिखरावर आहे. निकालानंतर राहुल गांधी व विजय हे एकमेकांच्या किती जवळ आहेत हेच दिसून आले.

पश्चिम बंगालमध्ये पराभवानंतरही ममता यांनी भाजपाच्या विरोधात आक्रमक भूमिका घेऊन लढा चालूच राहील असे जाहीर केल्यामुळे राहुल गांधी यांनी ममता बॅनर्जींना सहमती दर्शवली आहे. निवडणुकीत व्होट चोरी झाल्याचा त्यांनी आरोप केला आहे. सपाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी कोलकाता येथे जाऊन ममता यांना भेटून आम्ही आपल्याबरोबर असल्याचे सांगितले आहे. पुढील वर्षी उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणूक आहे, या राज्यातून काँग्रेसचे ६ व सपाचे ३७ खासदार लोकसभेत आहेत. पुढील वर्षी पंजाब, गुजरात, उत्तर प्रदेश या तीन प्रमुख राज्यात निवडणुका आहेत. इंडिया आघाडी जिवंत ठेवणे, काँग्रेसच्या दृष्टीने आवश्यक आहे.

विजय यांच्या टीव्हीके पक्षाला समर्थन देताना, संविधानावर विश्वास नसेल अशा जातीयवादी पक्षांना आघाडीबाहेर ठेवले जाईल, या अटीवर काँग्रेसने पाठिंबा दिला आहे. तामिळनाडूत गमावलेला जनाधार काँग्रेसला पुन्हा मिळवायचा आहे. विजय यांच्या पक्षाला दिलेले समर्थन आगामी लोकसभा, राज्यसभा व स्थानिक निवडणुकीतही कायम राहील असे काँग्रेसने म्हटले आहे. त्यानंतर लगेचच द्रमुकने काँग्रेसशी फारकत घेतल्याचे जाहीर केले आहे. लोकसभा अध्यक्षांना पत्र लिहून आमच्या खासदारांची आसन व्यवस्था काँग्रेस पासून दूर ठेवावी असे द्रमुकने कळवले आहे.

तामिळनाडूत द्रमुक व काँग्रेस यांच्यात इंदिरा गांधीपासून चांगले संबंध होते, राहुल गांधी व स्टॅलिन हे सुध्दा एकमेकांना भाई म्हणत असत. पण काँग्रेसने स्वतःच्या फायद्यासाठी विजय यांच्या टीव्हीके पक्षाला समर्थन दिले, हा इंडिया आघाडीतील मित्र पक्षांचा विश्वासघात आहे असे अनेकांना वाटते. इंडिया आघाडीत समन्वय असेल तर त्याचा लाभ प्रादेशिक पक्षांना होतो पण सर्वाधिक लाभ काँग्रेसला होतो. पण राज्यातही आम्हीच व केंद्रातही आम्हीच अशा पध्दतीने काँग्रेस मित्र पक्षांशी वागणार असेल तर मतविभाजनाचा लाभ भाजपाला होतो. काँग्रेसच्या मैत्रीमुळे विजय यांच्या टीव्हीकेचा प्रवेश इंडिया आघाडीत होणार की स्टॅलिन यांचा द्रमुक इंडियातून बाहेर पडणार? राजकारणात काहीही होऊ शकते.

---

# परभणीत उबाठाची नव्या पदाधिकाऱ्यांची घोषणा

## संजय जाधव गटाला झटका

■ परभणी

**उबाठाकडून** परभणी जिल्ह्यातील नवीन पदाधिकाऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार ही नव्याने कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, यामध्ये अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.

या नियुक्त्यांमध्ये खासदार संजय जाधव यांच्या निकटवर्तीयांना डावलण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अंतर्गत राजकारण पुन्हा चिघळण्याची शक्यता आहे. संजय जाधव यांच्या संभाव्य पक्षांतराच्या चर्चांमुळे हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. याआधी, जाधव समर्थक जिल्हाप्रमुखांना पदावरून हटवल्यानंतर त्यांच्या समर्थनार्थ तब्बल ८२ पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले होते. त्यामुळे परभणीतील पक्षांतर्गत वाद उघड झाला होता. आता नव्याने कार्यकारिणी जाहीर करत पक्षाने संघटनात्मक बदलांना गती दिली.नव्या कार्यकारिणीत २ विधानसभा प्रमुख, ६ उपजिल्हाप्रमुख, ९ तालुकाप्रमुख, ३ तालुका संघटक आणि ६ शहरप्रमुख यांसह विविध पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

---

# कोस्टल रोडवर रेमंडला हेलिपॅडसाठी मंजुरी ! महिन्याला ४ लाखांचा महसूल

■ मुंबई

**मुंबई** येथील कोस्टल रोडवर लवकरच हेलिपॅड उभारण्यात येणार असून, त्यासाठी रेमंड कंपनीला मंजुरी देण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी या प्रस्तावाला हिरवा कंदील दिला आहे. या हेलिपॅडमुळे पालिकेला दरमहा सुमारे ४ लाख रुपयांचा महसूल मिळणार आहे. हेलिकॉप्टर सेवेतून होणाऱ्या उत्पन्नातील ५० टक्के हिस्सा पालिकेला मिळणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

मुंबईतील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी प्रियदर्शिनी पार्क ते वरळी सी-लिंकदरम्यान कोस्टल रोड प्रकल्प राबविण्यात आला. ऑक्टोबर २०१८ मध्ये सुरू झालेला हा प्रकल्प मार्च २०२४ मध्ये वाहतुकीसाठी खुला झाला. सध्या या मार्गावर दररोज हजारो वाहनांची ये-जा होत असून, मुंबईकरांसाठी हा मार्ग महत्त्वाचा पर्याय ठरला आहे. आता या कोस्टल रोड परिसरात लहान आकाराच्या हेलिकॉप्टरसाठी उड्डाण आणि लँडिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हेलिपॅड उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

# शिक्षकांच्या बीएलओ ड्युटीवरून उबाठा नगरसेवकांचा संताप

■ मुंबई

**निवडणूक** प्रक्रिया पूर्ण होताच शिक्षकांना पुन्हा जनगणना आणि बीएलओ कामांसाठी नियुक्ती केल्यामुळे शिक्षकांवर अतिरिक्त कामामुळे शिक्षकांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम होऊ लागला आहे. या पार्श्वभूमीवर उबाठा गटाचे नगरसेवक अंकित प्रभू यांनी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण समितीच्या सभेत तीव्र नाराजी व्यक्त केली.

अंकित प्रभू म्हणाले की, विद्यार्थ्यांना जो वेळ शिक्षकांनी त्यांना घडवण्यासाठी द्यायला हवा, तो वेळ मिळत नाही. त्यामुळे शिक्षकांकडून शिक्षणाकडे दुर्लक्ष होत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. म्हणून हा निर्णय रद्द करण्यात यावा. मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण समितीने यासंदर्भात ठराव मंजूर करून तो विधी समितीकडे पाठवावा. तसेच, जर महाराष्ट्र राज्य सरकारकडून शिक्षकांना या एसआयआर कामांसाठी पाठवण्याबाबत कोणताही शासन निर्णय झाला.

---

# गणपतराव देशमुखांच्या पुत्राचे निधन ! सांगोल्यात हळहळ

■ सोलापूर

**सांगोला** विधानसभा मतदारसंघाचे आमदार स्वर्गीय गणपतराव देशमुख यांचा मोठा मुलगा पोपट गणपतराव देशमुख यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ६९ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांच्या निधनाने सांगोला आणि मोहोळ तालुक्यांत हळहळ व्यक्त होत आहे.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या कुटुंबावर या घटनेमुळे दु:खाचा डोंगर कोसळला आहे. सामाजिक क्षेत्रात शांतपणे कार्य करणारे आणि साधेपणाने जीवन जगणारे व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. पोपट देशमुख हे मोहोळ तालुक्यातील पेनूर गावचे रहिवासी होते. त्यांचे वडील गणपतराव देशमुख यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात भरीव ठसा उमटवला होता. राज्यातील सर्वाधिक काळ आमदार राहण्याचा विक्रम त्यांच्या नावावर असून, सलग अकरा वेळा विधानसभा निवडणूक जिंकून त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली होती. अशा समृद्ध राजकीय परंपरेत वाढूनही पोपट देशमुख यांनी सक्रिय राजकारणापासून जाणीवपूर्वक दूर राहणे पसंत केले. प्रकाशझोतात राहण्याऐवजी त्यांनी गावात राहून कुटुंब आणि समाजाशी घट्ट नाळ जपली.

---

# इर्शाळवाडीत ट्रेकिंगला गेलेल्या २० वर्षीय तरुणाचा मृत्यू

■ रायगड

**इर्शाळवाडी** येथे ट्रेकिंगदरम्यान डोंबिवलीतील २० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. रितेश कोणका असे मृत युवकाचे नाव असून, अचानक प्रकृती बिघडल्याने त्याचा मृत्यू झाला. उष्माघातामुळे मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी येथे सोमवारी डोंबिवलीतील सहा मित्रांचा गट ट्रेकिंगसाठी आला होता. साहिल सुर्वे, युवराज चव्हाण, मितेश गुप्ता, देवेश गुप्ता, क्रिश शेट्टी आणि रितेश कोणका हे मित्र ट्रेक करत असताना अचानक रितेशला अस्वस्थ वाटू लागले. काही वेळातच तो बेशुद्ध पडला. त्यानंतर दोन युवकांनी तातडीने पायथ्याशी धावत जाऊन ग्रामस्थांना माहिती दिली. माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.

डोंगराळ आणि कठीण मार्गामुळे ग्रामस्थांनी पारंपरिक झोळीच्या साहाय्याने रितेशला खाली आणले.

---

# हायड्रॉलिक लीकमुळे चेन्नई-अबू धाबी विमान रद्द!

■ चेन्नई



**अबू** धाबीला जाणाऱ्या एतिहाद एअरवेजच्या विमानात आज उड्डाणापूर्वीच तांत्रिक बिघाडामुळे ते रद्द करण्यात आले. या विमानात सुमारे २८० प्रवासी होते. एअरबस ए ३२० प्रकारच्या या विमानात उड्डाणपूर्व तपासणीदरम्यान हायड्रॉलिक लीक आढळल्याने अभियंता पथकाने ते उड्डाणासाठी अयोग्य घोषित केले. त्यानंतर विमान तातडीने धावपट्टीवरून परत आणून स्टँडवर नेण्यात आले आणि सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवण्यात आले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, या घटनेत कोणतीही आग लागण्याची किंवा उड्डाणादरम्यान आपत्कालीन परिस्थिती निर्माण होण्यासारखी शक्यता नाही. विमानात झालेला बिघाड केवळ तांत्रिक स्वरूपाचा होता.

---

# भगवती विद्यालय पटांगणात शून्य सावली प्रात्यक्षिक!

■ ठाणे

मराठी विज्ञान परिषदेतर्फे शनिवार १६ मे रोजी दुपारी १२ वाजता ठाणे नौपाडा येथील भगवती विद्यालयाच्या पटांगणात शून्य सावलीचे प्रात्यक्षिक दाखविले जाणार आहे. यावेळी खगोल अभ्यासक दा.कृ.सोमण आणि प्रा. ना.द. मांडगे याविषयाची सविस्तर माहिती सांगणार आहेत. विज्ञानप्रेमींसाठी हा कार्यक्रम विनामूल्य आहे.

---

# काँग्रेस सरचिटणीस अभय छाजेडांच्या गाडीचा पिरंगुट घाटात अपघात

■ पुणे

**महाराष्ट्र** प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अभय छाजेड यांच्या गाडीचा पुण्याजवळ भीषण अपघात झाला आहे. या अपघातात त्यांच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली असून, सध्या त्यांच्यावर पुण्यातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती स्थिर आहे.

अभय छाजेड हे पिरंगुट येथील त्यांच्या आर्किटेक्चर कॉलेजमधून पुण्याकडे इलेक्ट्रिक कारने येत होते. ते चालकाच्या शेजारील आसनावर बसले होते. पिरंगुट घाटात रात्री सुमारे ९ ते ९.३० वाजण्याच्या सुमारास घाटात कार थेट रस्त्यालगतच्या टेकडीवर जाऊन आदळली. धडक इतकी भीषण होती की, वाहनाचे मोठे नुकसान झाले. या अपघातात चालकासह छाजेड जखमी झाले. अपघातानंतर तेथून जाणाऱ्या नागरिकांनी त्यांना तत्काळ मदत करत त्यांना रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या चेहरा, मान आणि मणक्याला दुखापत झाली आहे. अभय छाजेड हे व्यावसायिकदृष्ट्या वकील असून, महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षातील ज्येष्ठ आणि अभ्यासू नेते म्हणून ओळखले जातात.

---

# नवी मुंबईत २ दिवस पाणीपुरवठा बंद

■ नवी मुंबई

**नवी** मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणाच्या जलवाहिनीची आणि भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्राची देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेतली जाणार असल्याने उद्या सकाळी १० वाजल्यापासून ते गुरुवारी सकाळी १० वाजेपर्यंत पाणीपुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. जलवाहिन्यांची दुरुस्ती, व्हॉल्व बसविणे, मुख्य जलवाहिन्यांची जोडणी, स्काडा अंतर्गत तांत्रिक कामे तसेच विद्युत दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत. सीबीडी बेलापूर सेक्टर-२८ येथील पंपगृहात तसेच भोकरपाडा आणि आदई परिसरात महत्त्वाची कामे हाती घेतली जाणार आहेत. या कामांमुळे बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे, सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली आणि ऐरोली या नोडमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे.

---

# भाजपा खासदारांप्रमाणे संरक्षण द्या आपच्या अरोरांची कोर्टाला विनंती

■ अमृतसर

**पुढील** वर्षी पंजाबमध्ये विधानसभा निवडणुका होणार असल्याने पंजाबमध्ये सत्ताधारी आप आणि भाजपामध्ये सध्या संघर्ष सुरू झाला आहे. आपचे पंजाबचे मंत्री संजय अरोरा यांना ईडीने मनी लाँडरिंगच्या गुन्ह्यात अटक केली आहे. अरोरा यांनी या कारवाईला आव्हान दिले आहे. या खटल्याच्या सुनावणीवेळी अरोरा यांच्या वकिलांनी युक्तिवाद केला की कोर्टाने ज्याप्रमाणे आपमधून फुटून भाजपामध्ये दाखल झालेल्या २ खासदारांना संरक्षण दिले तसेच संरक्षण मला द्यावे.

पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात आज मुख्य न्या. शील नागू आणि न्या.संजीव बेरी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी अरोरा यांच्या वतीने अ‍ॅड. पूनीत बेरी यांनी युक्तिवाद केला. ते म्हणाले की अरोरांवर दाखल आरोप आणि त्यावरील ईडीने दाखल केलेला गुन्हा आणि अटक बेकायदेशीर आहे, असा दावा अ‍ॅड. बेरी यांनी केला. आपमधून फुटून भाजपामध्ये प्रवेश केलेले संदीप पाठक आणि राजिंदर गुप्ता यांच्या नावांचा उल्लेख न करता अ‍ॅड. बेरी यांनी म्हटले की पाठक आणि गुप्ता हे खासदार आपमधून फुटल्याचे कळताच आपच्या सरकारने त्यांना दिलेले सुरक्षा कवच काढून घेतले होते. या युक्तिवादानंतर न्यायालयाने सुनावणी १४ मेपर्यंत पुढे ढकलली.






---

# पोलिसांसाठी गृहकर्ज योजनेला राज्य बँकेचे १७६८ कोटींचे अर्थसहाय्य

■ मुंबई

**राज्यातील** पोलीस अधिकारी व अंमलदारांना घर बांधणीसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्याच्या महत्वपूर्ण निर्णयाला आज महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे. गृहविभागाच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत पोलीस कर्मचार्यांसाठी घरबांधणी अग्रीम योजने अंतर्गत १७६८ रुपये कोटींची कर्जे उभारणी करण्यास मंजुरी देण्यात आली.

ही कर्जे उभारणी दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि, मार्फत करण्यात येणार असून, या योजनेचा लाभ राज्यातील हजारो पोलीस अधिकारी व अंमलदारांना मिळणार आहे.

शासनाने यापूर्वी ९७८१ पोलीस अधिकारी व अंमलदारांना या योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर सप्टेंबर २०२३ ते ३१ डिसेंबर२०२४ या कालावधीत प्राप्त झालेल्या घरबांधणी अग्रीम प्रस्तावाच्या आधारे आणखी ५४५९ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# निसर्गनिर्भर काटकसरीची कसरत

एकीकडे पंतप्रधानांनी अनेक गोष्टींबाबत काटकसर करण्याचे आवाहन केले आणि देशभरात एकच खळबळ उडाली. अर्थात यापूर्वीच्या पंतप्रधानांनीसुद्धा त्या त्यावेळची परिस्थिती पाहून काटकसरीचे आवाहन केले होते. अगदी व्यक्तीगत स्तरावरसुद्धा त्या-त्या व्यक्तीची आर्थिक परिस्थिती त्याच्या उत्पन्नाची साधने त्याला मिळणारी मिळकत या सर्वांचा अंदाज घेऊन तोदेखील काटकसर किंवा आपल्या खर्चाचे निर्णय करत असतो. परिस्थितीच माणसाला, समाजाला आणि अगदी देशालासुद्धा काही निर्णय घ्यायला भाग पाडते. आता देशपातळीवर तशीच काहीशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पंतप्रधानांनी आवाहन केलेले आहे. आर्थिक किंवा सामाजिक परिस्थितीचा अंदाज घेऊन जसे हे निर्णय घेतले जातात. तसेच एकूणच नैसर्गिक वातावरण, परिस्थिती आणि संभाव्य बदल लक्षात घेऊन शासकीय यंत्रणांना निर्णय घ्यावे लागतात. सध्या देशभरात कडाक्याचा उन्हाळा आहे. तापमानात गेल्यावर्षीच्या तुलनेत मोठी वाढ होते आहे. अगदी आपल्या महाराष्ट्रात दरवर्षी विदर्भ, मराठवाडा, खानदेश हा परिसर वैशाख वणव्याने अक्षरशः होरपळून निघतो तर दमट हवामानाच्या परिणामातून मुंबई, ठाणे, रायगड, कोकण किनारपट्टी घामाने डबडबून जाते. मात्र यावेळी मुंबईतसुद्धा तापमानाचा पारा चाळीसच्या आसपास येऊन ठेपला आहे. त्या सगळ्या तापमानाचे अंदाज घेऊन सावधानतेच्या सूचनाही दिल्या गेल्या आहेत. राज्याच्या अनेक भागात पाणीटंचाईचे संकट उभे ठाकले आहे. मुंबई, ठाणे, जिल्ह्यांसाठी असलेला पाणीसाठा कडक उन्हामुळे वेगाने कमी होतो आहे. मुंबई, ठाणेसह इतर भागात दहा टक्के पाणीकपात लागू झालेली आहे. म्हणजे आता निसर्गानेच ही काटकसर लादून सावधान राहाण्याचा इशाराच केलेला आहे. परिस्थिती ज्या पद्धतीने काटकसर किंवा सावधगिरीच्या उपाययोजना करायला जशी भाग पाडते त्याचे हे ताजे उदाहरण म्हणता येईल. वेधशाळांच्या अंदाजांप्रमाणे पुढचा आठवडाभर तापमानाची तीच परिस्थिती कायम राहाणार आहे. याचा अर्थ पाणी टंचाईचे संकट अधिक वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### परिस्थितीने लादलेली काटकसर

सृष्टीचे दैनंदिन चक्र हे सृष्टीतच उपलब्ध होणाऱ्या वेगवेगळ्या स्त्रोतांवर अवलंबून असते. सुदैवाने भारतासारख्या समान ऋतुचक्र असलेल्या देशात पाण्यापासून ते वीज किंवा अन्य प्रकारच्या इंधनापर्यंत निसर्गनिर्मित व्यवस्था उपलब्ध होऊ शकतात. आज ज्या पद्धतीचे इंधन मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. त्यात पेट्रोल-डिझेल किंवा नैसर्गिक वायू असेल. या गोष्टी भूगर्भातूनच उपलब्ध होतात. भारताबाहेरच्या अनेक देशांमध्ये हे इंधन साठे मुबलक जरी असले तरी सगळ्या जगाला पुरून उरेल. एवढा इंधनसाठा नसतो. म्हणूनच अनेक देशांमध्ये अत्यंत महागड्या किमतीने इंधन विकत घेण्याची वेळ येते. भारताला या इंधनसाठ्याची करावी लागणारी व्यवस्था प्रचंड खर्चिक झालेली आहे. अमेरिका, इराण युद्धानंतर आपल्या इंधनसाठ्याच्या पुरवठ्यावर परिणाम होतो आहे. आणि हे इंधन मिळवण्याकरीता तितकीच ज्यादा किंमतही मोजावी लागते आहे. ती परिस्थिती खूप काळ खेचून नेता येणे शक्य नसल्याने पंतप्रधानांना काटकसरीच्या सूचना कराव्या लागल्या. म्हणजे परिस्थितीनेच काटकसर करायला भाग पाडले आहे. सध्या जगभर वाढत जाणारे तापमान केवळ उष्णता निर्माण करते आहे असे नाही तर भूगर्भातील जलसाठे कमी होत आहेत. शिवाय उष्णतेमुळेच जंगलांना लागणाऱ्या आगींचे प्रमाण वाढते आहे. त्यामधून दैनंदिन गरजेसाठी लागणाऱ्या ऊर्जेवरही परिणाम होतो आहे. एकीकडे ऊर्जेची मागणी वाढत आहे. तर दुसरीकडे नैसर्गिकरित्या उपलब्ध करून देणारे स्त्रोत कमी होत चालले आहेत. पाणी, कोळसा यांच्यावरही परिणाम होत असल्याने ऊर्जेची बचत किंवा काटकसर भविष्यकाळासाठी तितकीच महत्त्वाची ठरते. विज्ञान,तंत्रज्ञानाचे अनेक प्रकारचे अप्रत्यक्ष परिणाम जगातल्या सगळ्याच देशांना जाणवत आहेत. प्रचंड वेगाने होत असलेले औद्योगीकरण शहरांची वाढ म्हणजेच नागरीकरण, वाढत्या लोकसंख्येला अपुऱ्या पडणाऱ्या साधनसुविधा या गोष्टीदेखील निसर्गनिर्मित परिस्थितीचाच अनिवार्य भाग ठरतो. स्वाभाविकपणे भविष्यकाळातल्या संभाव्य टंचाईची जाणीव ठेवून आतापासूनच काही सावधगिरीच्या उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरतात.

### मुबलक पाणी तरी आणीबाणी

एवढेच नव्हे तर जगातल्या सगळ्या देशांमध्ये शुद्ध पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. संपूर्ण सृष्टीवर ७० टक्के पाणीसाठा असताना चांगले आणि पुरेसे पिण्याचे पाणी मिळू शकत नाही. हा निसर्गाचाच आश्चर्यकारक प्रकार ठरतो. विज्ञान, तंत्रज्ञान इतके पुढे गेले असतानाही कोणत्याही देशाने शंभर टक्के समुद्राच्या पाण्याचे गोड पाण्यात रुपांतर करू शकलेले नाही. तिथेसुद्धा निसर्गनिर्मित या परिस्थितीपुढे मनुष्य किंवा विज्ञानदेखील हतबल होऊन जाते. म्हणूनच आजुबाजूला प्रचंड पाणीसाठा असताना पिण्याचे पाणी काटकसरीनेच वापरण्याची वेळ येते. एकूणच सृष्टीचक्र किंवा समाजजीवनाचा विचार करता स्वावलंबी किंवा पूर्ण आत्मनिर्भर होऊ शकत नाही. त्याला निसर्गनिर्भरच राहावे लागते आणि या निसर्ग निर्भर काटकसरीची कसरतही करावी लागते. जर अन्य नैसर्गिक स्त्रोतांबाबत ही परिस्थिती असेल तर मनुष्यनिर्मित अनेक गोष्टींबाबत सावधानता बाळगणे आणि आहे त्याच साधनसुविधांचा मर्यादित वापर करणे असा एकच पर्याय शिल्लक राहातो. बदलत्या काळाची बदलती पावले ओळखण्याचा समंजसपणा किंवा दूरदृष्टी दाखवता आली पाहिजे. पाण्याच्या वापरापासून ते सोन्याच्या किमतींपर्यंत सर्वांचेच स्थान अमूल्य आहे. कुठेही निसर्गाचे शोषण होणार नाही पण मनुष्यजीवनाचे योग्य पद्धतीने भरणपोषण होत राहील याची जाणीव खूप महत्त्वाची ठरते. दुर्दैवाने हे भान ठेवले जात नाही. अनेक गोष्टी वाया घालवल्या जातात. जगभरात रोज सत्तर लाख टन अन्नधान्य वाया जात असतो. योग्य ती काळजी न घेतल्याने धान्याची होणारी नासाडी या सगळयाच बाबी समाजाला लागलेल्या अनिष्ट सवयीच ठरतात. त्यामध्ये काळानुसार सुधारणा करणे गरजेचे ठरते.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

पाण्याचा थेंब जेव्हा सातत्याने दगडावर पडतो,तेव्हा तो दगडही फोडतो. ही ताकद थेंबाच्या वजनाची नसून त्याच्या सातत्याची असते.

## पंचांग

**बुधवार, १३ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

* वैशाख कृष्ण एकादशी
* नक्षत्र : उत्तरा भाद्रपदा



रवी उदय- ०६-०६
रवी अस्त- १९-०४

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मीन

**अपरा एकादशी, संत पारनेरकर महाराज, वार्षिकोत्सव-पारनेर**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### व्हेज चिकन नगेट्स



★ **साहित्य : सोया मिश्रणासाठी:** २ कप सोया चंक्स, पाणी (भिजवण्यासाठी), १/२ टीस्पून मिरची पावडर, १/२ टीस्पून जिरे पावडर, १/२ टीस्पून गरम मसाला, २ मिरच्या (बारीक चिरलेल्या), २ टेबलस्पून कोथिंबीर (चिरलेली), ३/४ टीस्पून मीठ, १ टीस्पून आले-लसूण पेस्ट, २ बटाटे (उकडलेले आणि मॅश केलेले), २ टेबलस्पून कॉर्न फ्लोअर. **बॅटरसाठी:** १/२ कप कॉर्न फ्लोअर. १/२ कप मैदा, १/४ टीस्पून काळी मिरी पावडर, १/४ टीस्पून मीठ, पाणी (बॅटरसाठी), **इतर साहित्य:** १ कप कॉर्न फ्लेक्स (चंक्ससाठी), तेल (तळण्यासाठी),

★ **कृती:** सर्वप्रथम सोया चंक्स कोमट पाण्यात २० मिनिटे भिजवा. पाणी काढून टाका आणि स्वच्छ धुवा. पाणी पिळून घ्या आणि मिक्सरच्या भांड्यात घेऊन जाडसर वाटून घ्या. ते एका मोठ्या भांड्यात काढा. त्यात तिखट, जिरेपूड, गरम मसाला, मिरच्या, कोथिंबीर, टीस्पून मीठ आणि आले-लसूण पेस्ट घाला. तसेच, २ बटाटे आणि २ टेबलस्पून कॉर्नफ्लोअर घाला. चांगले मिसळा. मिश्रण एकजीव होईपर्यंत दाबून चांगले मिसळा. आता मिश्रणाचे गोळे बनवून त्यांना अंदाजे आकार द्या. बाजूला ठेवा. आता बॅटर तयार करा. कॉर्नफ्लोअर, मैदा, काळी मिरीपूड आणि मीठ घ्या. गुळगुळीत बॅटर तयार होईपर्यंत आवश्यकतेनुसार पाणी घाला. आता सोया नगेट्स कॉर्नफ्लोअरच्या बॅटरमध्ये बुडवा. त्यांना कुस्करलेल्या कॉर्नफ्लेक्सचे आवरण लावा. मध्यम आचेवर गरम तेलात तळून घ्या. मधूनमधून ढवळत राहा आणि नगेट्स सोनेरी तपकिरी व कुरकुरीत होईपर्यंत तळा.
शेवटी, टोमॅटो सॉससोबत व्हेज चिकन नगेट्स खायला द्या.




# रायपूरमध्ये आज अजिंक्य-विराट आमनेसामने

## प्लेऑफसाठी केकेआरला आरसीबीचे आव्हान

**आयपीएल २०२६ मधील ५७ व्या सामन्यात प्लेऑफची शर्यत रंगतदार झाली आहे. प्रत्येक सामना संघांचे भवितव्य ठरवणारा ठरत आहे. रायपूरच्या शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर उद्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात हायव्होल्टेज लढत रंगणार आहे. एका बाजूला विराट कोहलीच्या पुनरागमनाकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे तर दुसऱ्या बाजूला अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली सलग विजय मिळवत आत्मविश्वासात असलेला केकेआर संघ आरसीबीला मोठे आव्हान देण्यास सज्ज आहे. गुणतालिकेतील अव्वल स्थान मजबूत करण्यासाठी आरसीबीला विजय आवश्यक आहे तर प्लेऑफच्या आशा कायम ठेवण्यासाठी अजिंक्यच्या केकेआरसमोर विराटचे आव्हान आहे.**




■ रायपूर

**रजत** पाटीदारच्या नेतृत्वात आरसीबीने यावर्षीच्या हंगामात सातत्यपूर्ण कामगिरी करत ११ सामन्यांत सात विजयांसह गुणतालिकेतील अव्वल स्थान पटकावले आहे. संघाने शेवटच्या पाच सामन्यांपैकी तीन सामने जिंकल्याने आत्मविश्वासात वाढ झाली आहे. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या थरारक सामन्यात अखेरच्या चेंडूवर मिळवलेला विजय संघासाठी मोठा टर्निंग पॉइंट ठरला. त्या सामन्यात भुवनेश्वर कुमारने गोलंदाजी आणि फलंदाजी या दोन्ही विभागांत योगदान दिले, तर कृणाल पांड्याने दबावाच्या क्षणी खेळलेले धाडसी अर्धशतक संघाच्या विजयाचा पाया ठरले.

मात्र, आरसीबीसमोर काही चिंता कायम आहेत. विराट कोहली सलग दोन डावांत शून्यावर बाद झाल्याने त्याच्याकडून मोठ्या खेळीची अपेक्षा आहे. फिल सॉल्ट दुखापतीमुळे बाहेर असल्याने जेकब बेथेलला संधी मिळाली असली, तरी तो अद्याप प्रभाव पाडू शकलेला नाही. कर्णधार रजत पाटीदारवर मधल्या फळीत जबाबदारी असेल, तर जोश हेझलवूडकडूनही अधिक प्रभावी गोलंदाजीची अपेक्षा आहे.

दुसरीकडे, अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील केकेआर संघ पुन्हा लयीत आला आहे. सलग चार विजयांमुळे संघाचा आत्मविश्वास वाढला असून प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी त्यांना उर्वरित सामने जिंकणे आवश्यक आहे. दिल्लीविरुद्ध शतक झळकावणाऱ्या फिन लनसह रिंकू सिंग, सुनील नरेन आणि वरुण चक्रवर्ती यांच्यावर संघाच्या कामगिरीची मोठी जबाबदारी असेल.

## कॅरम खेळाडूंना आरक्षण द्या ऑलिम्पिक संघटनेकडे मागणी

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** कॅरम खेळाच्या विकासासाठी तसेच खेळाडूंच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र कॅरम संघटनेने महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेकडे खेळाडूंना आरक्षण देण्याची मागणी केली. संघटनेचे कार्याध्यक्ष आणि पुणे कॅरम संघटनेचे अध्यक्ष भारत देसडला यांनी महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष तसेच केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची पुण्यात भेट घेतली.

या भेटीदरम्यान देसडला यांनी महाराष्ट्र कॅरम संघटनेच्या विविध मागण्यांचे निवेदन तसेच पुणे कॅरम संघटनेचा वार्षिक अहवाल मोहोळ यांच्याकडे सुपूर्द केला. राज्यातील कॅरम खेळाडूंना भेडसावणाऱ्या अडचणी, खेळासाठी आवश्यक सुविधा, खेळाडूंना मिळणारे अपुरे प्रोत्साहन आणि संघटनात्मक अडचणी याबाबत सविस्तर चर्चा केली.


## आयपीएलनंतर युरोपमध्ये ईटीपीएल द्रविड संघमालक तर अश्विनकडे नेतृत्व

■ नवी दिल्ली

**जगभरात** टी-२० क्रिकेट लीगची वाढती लोकप्रियता लक्षात घेता आता युरोपमध्येही नव्या स्पर्धेची भर पडणार आहे. युरोपियन टी-२० प्रीमियर लीगची घोषणा झाली. त्यामध्ये भारताचे माजी प्रशिक्षक राहुल द्रविड हे 'डब्लिन गार्डियन्स' संघाचे मालक बनले आहेत. तर अनुभवी फिरकीपटू रविचंद्रन अश्विनकडे संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. क्रिकेटमधील नव्या भूमिकेबाबत द्रविड उत्सुक असून, संघाच्या दैनंदिन निर्णयांमध्ये हस्तक्षेप न करता अश्विनला पूर्ण स्वातंत्र्य देणार असल्याचे स्पष्ट केले.

राहुल द्रविड यांनी सांगितले की, ही माझ्यासाठी पूर्णपणे नवीन भूमिका आहे. मी कोणत्या प्रकारचा मालक असेन हे मलाही अनुभवातून समजेल. मात्र, क्रिकेटच्या दैनंदिन घडामोडींपासून थोडे अंतर ठेवण्याचा माझा प्रयत्न असेल.माझे मुख्य लक्ष मजबूत संघरचना उभी करण्यावर आहे. तुम्हाला मी प्रत्येक सराव सत्रात किंवा प्रत्येक सामन्यात दिसणार नाही.

# विनेशच्या पुनरागमनावरून वाद साक्षीने कुस्ती महासंघाला सुनावले



■ नवी दिल्ली


**ऑलिम्पिक** पदक विजेती साक्षी मलिक हिने सहकारी कुस्तीपटू विनेश फोगाट हिच्या समर्थनार्थ उघडपणे भूमिका घेतली आहे. निवृत्तीनंतर पुन्हा स्पर्धात्मक कुस्तीमध्ये उतरण्याच्या विनेशच्या निर्णयावरून तिचा आणि कुस्ती महासंघ यांच्यात वाद निर्माण झाला आहे.

गोंडा येथील राष्ट्रीय खुल्या मानांकन स्पर्धेत सहभागी होण्याचा विनेश फोगाटने प्रयत्न केला होता. मात्र, पुनरागमनासाठी सहा महिन्यांचा अनिवार्य नोटीस कालावधी पूर्ण न केल्याचे कारण देत डब्ल्यूएफआयने तिला अपात्र ठरवले. आई झाल्यानंतरही पुन्हा देशासाठी पदके जिंकण्याची इच्छा असल्याचे सांगत विनेशने पुनरागमनाचा निर्धार कायम ठेवला आहे.

या पार्श्वभूमीवर साक्षी मलिकने व्हिडिओ शेअर करत फेडरेशनवर टीका केली. विनेश सध्या काँग्रेसची आमदार असल्यामुळे राजकीय विषयांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करते. मात्र हा विषय केवळ राजकारणापुरता मर्यादित नाही. जगातील अनेक देश महिला खेळाडूंना मातृत्वानंतर पुन्हा खेळात परतण्यासाठी विशेष सवलती आणि अनुकूल नियम देतात. मात्र, भारतात उलट परिस्थिती आहे. विनेशला पुनरागमनापासून रोखण्यासाठीच नियम लावले जात आहेत. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय आणि कुस्ती महासंघाने विनेशला निष्पक्ष संधी द्यावी. विनेशची चाचणी घ्या, तिला संधी द्या. ती पुन्हा देशासाठी पदके जिंकू शकते आणि आई झाल्यानंतरही महिलांनी मोठी स्वप्ने पाहू शकतात, याचा आदर्श निर्माण करू शकते.

## भारतात फिफा विश्वचषक दिसणार नाही? प्रसारणावर प्रश्नचिन्ह

■ नवी दिल्ली



**जगातील** सर्वात लोकप्रिय फुटबॉल स्पर्धांपैकी एक असलेला २०२६ फिफा विश्वचषक पुढील वर्षी ११ जूनपासून सुरू होणार आहे. अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा या तीन देशांमध्ये ही स्पर्धा खेळवली होणार आहे. मात्र, भारतात या स्पर्धेचे थेट प्रक्षेपण होण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

भारतातील कोणत्याही मोठ्या प्रसारकाने अद्याप या स्पर्धेचे प्रक्षेपण हक्क घेण्यामध्ये रस दाखवलेला नाही. त्यामुळे २०२६ चा फिफा विश्वचषक भारतीय चाहत्यांना दूरचित्रवाणी किंवा डिजिटल माध्यमांवर पाहता येणार नसल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशीच परिस्थिती चीनमध्येही असल्याची माहिती आहे.रिलायन्स-डिस्ने समूहाने फिफा विश्वचषकासाठी सुमारे २० दशलक्ष डॉलर्सची बोली लावली होती. मात्र, फिफाने अधिक रकमेची मागणी केल्यामुळे हा प्रस्ताव फेटाळला. त्यामुळे भारतातील प्रक्षेपणाचा प्रश्न अजूनही अनिश्चित आहे.

## आयपीएलमध्ये ४ कर्णधार बदलणार हर्ष गोयंकांच्या वक्तव्याने खळबळ

■ नवी दिल्ली

**उद्योगपती** हर्ष गोयंका यांनी सध्या सुरू असलेल्या आयपीएल २०२६ हंगामानंतर काही संघांच्या नेतृत्वात मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली. यासंदर्भातील त्यांच्या एक्स पोस्टमुळे क्रिकेटविश्वात चर्चा रंगली आहे.गोयंका यांनी कोणाचेही नाव स्पष्टपणे घेतले नाही. तरी गेल्या दोन हंगामांतील कामगिरीतील काही नावे चर्चेत आहेत.यामध्ये लखनौ संघाचा कर्णधार ऋषभ पंत आणि दिल्ली संघाचा कर्णधार अक्षर पटेल यांचा समावेश आहे.

हर्ष गोयंका यांनी एक्सवर लिहिले की, पुढील हंगामात किमान चार कर्णधार आपल्या संघांचे नेतृत्व करताना दिसणार नाहीत. त्यापैकी दोन जण तर हा हंगाम संपण्यापूर्वीच बाजूला होऊ शकतात. ते चार कोण असतील हे ओळखणे फार कठीण नाही.

## बदलापूरमध्ये राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचा महासंग्राम

**बदलापूर** - बदलापूरमध्ये प्रतिष्ठेच्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी शहर सज्ज झाले आहे. १३ ते १७ मे २०२६ या कालावधीत होणाऱ्या या मानाच्या स्पर्धेत राज्यभरातील आठ विभागांतील ३८४ खेळाडू सहभागी होणार असून, तब्बल २३ लाख ३५ हजार रुपयांच्या रोख पारितोषिकांसाठी स्पर्धा होईल. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटना आणि कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे भव्य उद्घाटन १३ मे रोजी सायंकाळी सहा वाजता हेंद्रेपाडा येथील बदलापूर जिमखाना मैदानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होईल.

## वेगवान गोलंदाज शबनिमचे ३ वर्षांनंतर पुनरागमन

■ मुंबई

**महिला** टी-२० विश्वचषक २०२६ सुरू होण्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघाला मोठा दिलासा मिळाला आहे. संघाची अनुभवी आणि वेगवान गोलंदाज शबनिम इस्माईलने तब्बल तीन वर्षांनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन केले आहे. विशेष म्हणजे, महिला क्रिकेटमधील सर्वात वेगवान चेंडू टाकण्याचा विक्रमही तिच्याच नावावर आहे.




३७ वर्षीय शबनिम इस्माईलने २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. मात्र, आता तिने निर्णय बदलत पुन्हा दक्षिण आफ्रिकेच्या संघात प्रवेश केला. १२ जूनपासून सुरू होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषकासाठी जाहीर केलेल्या १५ सदस्यीय संघात तिचा समावेश आहे. या स्पर्धेचे सामने ५ जुलैपर्यंत खेळवले जाणार आहेत.

शबनिमने दक्षिण आफ्रिकेसाठी शेवटचा सामना २०२३ मध्ये केप टाऊन येथे झालेल्या महिला टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत खेळला होता. आपल्या कारकिर्दीत तिने ११३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत १२३ बळी घेतले आहेत. हा दक्षिण आफ्रिकेसाठी विक्रमी आकडा मानला जातो.

# हरिद्वार रामशंकर हत्या प्रकरण सीबीआय चौकशी करणार

■ हरिद्वार

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**डिसेंबर** २०२४ मध्ये हरिद्वारच्या खानपूर भागातील चंद्रपुरी गावचे रहिवासी असलेल्या रामशंकर यांच्या हत्येचा तपास आता सीबीआय करणार आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सोमवारी सीबीआयच्या डेहराडून शाखेत या प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला. मृत रामशंकर यांच्या पत्नीने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना, खानपूर पोलिसांनी हत्येच्या तपासात हलगर्जीपणा केल्याचे उच्च न्यायालयाने मान्य केले. पोलिसांनी न्यायवैद्यक तपासणीशिवाय आरोपपत्र दाखल केले होते. आरोपपत्रातून नावे वगळण्यात आलेल्या दोन मुख्य आरोपींची चौकशी करण्यात आली नाही. घटनेत वापरलेल्या गाडीचा मार्ग आणि न्यायवैद्यक तपासणीही करण्यात आली नाही. ८ डिसेंबर २०२४ रामशंकर अचानक गायब झाला. दुसऱ्या दिवशी रामशंकरच्या वडिलांच्या तक्रारीवरून खानपूर पोलिसांनी तो हरवल्याची नोंद करून प्रकरणाचा तपास सुरू केला. ५ दिवसांनंतर तपासात पोलिसांनी रॉबिन नावाच्या एका संशयिताला आणि त्याच गावातील एका अल्पवयीन मुलाला अटक केली.

# वाराणसीमध्ये वक्फच्या अतिथीगृहावर बुलडोझर

■ वाराणसी

**दाल** मंडी येथे सुरू असलेल्या रस्ता रुंदीकरण मोहिमेअंतर्गत प्रशासनाने आज वक्फच्या अतिथीगृह बुलडोझरने पाडून मोठी कारवाई केली. या कारवाईत संपूर्ण परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. ही कारवाई पाहण्यासाठी लोकांची एकच गर्दी झाली होती.

सकाळी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पालिका अधिकाऱ्यांचे एक पथक, मोठ्या पोलीस बंदोबस्तात आणि निमलष्करी दलांसह घटनास्थळी दाखल झाले. पाडकामादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून संपूर्ण परिसर सील करून बॅरिकेड लावण्यात आले होते. रस्त्याच्या दोन्ही टोकांपासून एकाच वेळी तीन बुलडोझर चालवण्यात आले. शासकीय अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार इमारत पाडण्यासाठी सुरुवातीला १२ दिवसांची मुदत देण्यात आली होती. ही मुदत संपल्यानंतर प्रशासनाने मंगळवारी पाडकामाची कार्यवाही सुरू केली. बुलडोझरने इमारत पाडली जात असताना आजूबाजूच्या परिसरात गर्दी जमली होती. ही मालमत्ता रुंदीकरण प्रकल्पाच्या कक्षेत येत होती. दाल मंडी परिसरात रस्ता रुंदीकरणाचे काम बऱ्याच काळापासून प्रस्तावित आहे. प्रशासनाचा दावा आहे की, एकदा हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर परिसरातील वाहतूक कोंडी कमी होईल आणि लोकांना चांगल्या वाहतूक सुविधा मिळतील.

देश विदेश

# फिलिपिन्सच्या उपराष्ट्राध्यक्ष डुटेर्टे विरोधात महाभियोग प्रस्ताव

■ मनिला

**फिलिपिन्सच्या** प्रतिनिधी सभागृहाने उपराष्ट्राध्यक्ष सारा डुटेर्टे यांच्या विरोधात महाभियोगाचा प्रस्ताव बहुमताने मंजूर केला. त्यांच्यावर प्रचंड संपत्ती जमा करणे, सार्वजनिक निधीचा गैरवापर करणे आणि राष्ट्राध्यक्षांच्या हत्येची धमकी दिल्याचा आरोप आहे. अध्यक्ष बोंगबोंग मार्कोस यांच्या मित्रपक्षांचे वर्चस्व असलेल्या कनिष्ठ सभागृहात २५५ खासदारांनी महाभियोग प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले, तर २६ जणांनी विरोधात मतदान केले आणि ९ खासदार तटस्थ राहिले. त्यांच्यावर उपराष्ट्राध्यक्ष कार्यालय आणि शिक्षण मंत्रालयाच्या गोपनीय निधीचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. त्यांच्यावर सरकारी निधीच्या हिशोबात पारदर्शकतेचा अभाव आणि मोठ्या प्रमाणात संशयास्पद संपत्ती जमा केल्याचाही आरोप आहे. सर्वात गंभीर आरोप राष्ट्राध्यक्ष मार्कोस ज्युनियर आणि त्यांच्या कुटुंबियांना धमकी दिल्याचा आहे. सारा डुटेर्टे या फिलिपिन्सचे माजी राष्ट्राध्यक्ष रॉड्रिगो डुटेर्टे यांच्या कन्या आहेत. त्यांनी आपल्यावरील आरोप नाकारले आहेत, मात्र त्यांनी आरोपांवर सविस्तर उत्तर दिलेले नाही. हे उल्लेखनीय आहे की, गेल्या वर्षीदेखील प्रतिनिधीगृहात त्यांच्या विरोधात महाभियोगाचा प्रस्ताव आणण्यात आला होता, परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या घटनात्मक तांत्रिक बाबींचा हवाला देत त्यावेळी त्यांच्यावरील खटला चालवता आला नाही.

# इंडोनेशियात ऑनलाइन जुगाराविरुद्ध मोठी कारवाई

■ जकार्ता

**इंडोनेशियामध्ये** ऑनलाइन जुगाराविरुद्ध पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत ३०० पेक्षा जास्त जणांना अटक केली. राजधानी जकार्तामध्ये घातलेल्या छाप्यानंतर ही कारवाई करण्यात आली. अटक करण्यात आलेले बहुतेक जण विदेशी नागरिक आहेत. इंडोनेशियामध्ये बेकायदेशीर डिजिटल बेटिंग नेटवर्कवर करण्यात आलेली आतापर्यंतच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कारवाई होती, असेही पोलिसांनी म्हटले आहे. जकार्तातील चायना टाऊन या भागातून ७० ऑनलाइन गॅम्बलिकंग वेबसाइट चालवल्या जातात. या वेबसाईटच्या माध्यमातून विदेशी लोकांना लक्ष्य केले जात असायचे. याठिकाणी छापा घालून हे नेटवर्क उद्ध्वस्त करण्यात आले. डिजिटल पुरावे आणि मार्केटिंगच्या नोंदी देखील जप्त करण्यात आल्या, असे पोलिसांनी सांगितले. अटक केलेल्यांमध्ये २२८ व्हिएतनामी, ५७ चिनी नागरिक असून उर्वरित लाओस, म्यानमार, थायलंड, मलेशिया आणि कंबोडिया येथील आहेत.

# क्युबामध्ये ऊर्जा संकटामुळे ९६ हजार शस्त्रक्रिया लांबणीवर

■ हवाना

**अमेरिकेचे** अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने लादलेल्या नव्या निर्बंधांमुळे क्युबावरील ऊर्जा संकट अधिक गडद झाले. त्यामुळे क्युबामध्ये ९६ हजार वैद्यकीय शस्त्रक्रिया लांबणीवर पडल्या असून, त्यापैकी ११ हजार शस्त्रक्रिया मुलांच्या आहेत. देशातील शाळांच्या वेळापत्रकांवर कात्री केलेली आहे.

अमेरिकेने जानेवारीपासून क्युबाला होणारा तेलपुरवठा थांबवला आहे. त्यामुळे आधीच अडचणीत आलेल्या क्युबाच्या अर्थकारणावर या नवीन निर्बंधांमुळे आणखी विपरीत परिणाम होऊ शकणार आहेत, असे अर्थतज्ज्ञांनी म्हटले. अमेरिकेने क्युबाच्या कंपनीवर निर्बंध लावले. क्युबाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या ग्रुप डी ॲडमिनिस्ट्रेसिएल एप्रेसेरियल एस. ए. अर्थात गाएसा या कंपनीवर हे निर्बंध घालण्यात आले आहे. गाएसा व्यतिरिक्त कॅनडाच्या शेरिएट इंटरनॅशनलबरोबर क्युबाचा संयुक्त उपक्रम असलेल्या मोआ निकेलवरही निर्बंध घातले गेले. निर्बंधांची घोषणा झाल्यानंतर कॅनडाच्या कंपनीने तात्काळ उद्योगातून माघार घेण्याची घोषणा केली. ही कंपनी ३२ वर्षांपासून क्युबामध्ये कार्यरत होती.

# कलिंगड खाल्ल्यानंतर १५ वर्षीय मुलाचा मृत्यू

■ रायपूर

**मुंबईत** कलिंगड खाल्यानंतर एका कुटुंबातील चार सदस्यांचा मृत्यू झाल्याचे गूढ अद्याप उलगडलेले नसताना छत्तीसगडमधील जांजगीर-चांपा जिल्ह्यात कलिंगड खाल्ल्यानंतर १५ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. आणखी तीन मुलांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमागे अन्न विषबाधेची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. जांजगीर-चांपा जिल्ह्यातील एका घरात



कापून ठेवलेले कलिंगड खाल्ल्यानंतर १५ वर्षाच्या मुलाला उलट्या सुरू झाल्या. त्यानंतर त्याला जुलाब आणि श्वास घेण्यास त्रास होऊ लागला, अशी माहिती जिल्हा रुग्णालयाच्या डॉक्टरांनी दिली. प्राथमिक अंदाजानुसार, दूषित कलिंगड खाल्ल्यामुळे मुलांना अन्न विषबाधा झाल्याची शक्यता असून, याबाबत अधिक तपास सुरू आहे.

# पेपरफुटीच्या आरोपामुळे नीट परीक्षा रद्द!

पान १ वरून

नोंदणी आणि निवडलेली परीक्षा केंद्र फेरपरीक्षेसाठी कायम राहणार आहेत. कोणतीही नवीन नोंदणी किंवा अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही. फेरपरीक्षेचा खर्च एनटीए उचलणार आहे. मात्र या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिंता आणि संभ्रम निर्माण झाला आहे. वर्षभर कठोर मेहनत करून परीक्षा दिल्यानंतर अचानक ती रद्द झाल्याने अनेक विद्यार्थ्यांना मानसिक तणावाचा सामना करावा लागत आहे. काही विद्यार्थी परीक्षा झाल्यानंतर आपल्या गावी परतले होते, तर काही सुट्टीसाठी बाहेर गेले होते. मात्र फेरपरीक्षेच्या अनिश्चिततेमुळे पुढील नियोजनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसची राष्ट्रीय विद्यार्थी संघटना (एनएसयूआय) च्या कार्यकर्त्यांनी दिल्लीतील केंद्रीय शिक्षण मंत्रालयाबाहेर जोरदार आंदोलन केले. शास्त्री भवन परिसरात घोषणाबाजी करत त्यांनी निषेध व्यक्त केला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. एनएसयूआयचे राष्ट्रीय अध्यक्ष विनोद जाखर म्हणाले की, ज्यांनी अत्यंत जिद्दीने आणि प्रामाणिकपणे नीट परीक्षेची तयारी केली, त्यांच्या भवितव्याशी खेळ केला आहे. या प्रकरणातील दोषींविरुद्ध कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी. कटात सहभागी प्रत्येकाला कडक शिक्षा मिळाली पाहिजे. या प्रकरणात सरकार आणि प्रशासनातील काही व्यक्तींचाही सहभाग असू शकतो. सरकारने, विशेषतः धर्मेंद्र प्रधान यांनी, या अपयशाची जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा द्यावा. राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) वर बंदी घालण्यात यावी.

३ मे रोजी झालेल्या यंदाच्या नीट परीक्षेला देशभरातून २२.७९ लाखांहून अधिक विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. मात्र परीक्षेनंतर लगेचच पेपरफुटीचे प्रकरण उघड झाल्याने विद्यार्थी, पालक आणि कोचिंग क्षेत्रात मोठी खळबळ उडाली होती. गेस पेपरच्या माध्यमातून या परीक्षेचा लीक झाल्याचा आरोप झाला होता. आधीच विद्यार्थ्यांमध्ये फिरत असलेल्या ४१० प्रश्नांच्या गेस (अपेक्षित) पेपरमधील सुमारे १२० प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेच्या पेपरात होते. तपासात असेही उघड झाले की, प्रश्नपत्रिकेतील तब्बल ६०० गुणांचे प्रश्न दोन दिवस आधीच काही विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले होते. एनटीएने ८ मे रोजी या प्रकरणाची माहिती स्वतंत्र पडताळणीसाठी केंद्रीय तपास यंत्रणांकडे पाठवली होती. त्यानंतर केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला.

या प्रकरणात आतापर्यंत १५ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## २०२४ मध्येही पेपर लीक झाला होता

नीट यूजी २०२४ परीक्षा पेपर फुटल्याच्या आरोपांमुळे देशभरात मोठा वाद निर्माण झाला होता. बिहारमध्ये प्रश्नपत्रिकाफुटीचा प्रकार उघडकीस आला होता. आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासात प्रश्नपत्रिका ३० ते ५० लाख रुपयांना विकल्या जात असल्याचे समोर आले. या प्रकरणात १३ जणांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणामुळे देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली होती. निकालात ६७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाल्याने संशय अधिक गडद झाला. या परीक्षेच्या निकालातील अनियमिततेच्या आरोपांमुळे मोठ्या प्रमाणावर आंदोलन झाले. २३ जुलै २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणावर महत्त्वाचा निर्णय देत देशव्यापी स्तरावर पेपर लीक झाल्याचे ठोस पुरावे नसल्याचे स्पष्ट केले. बिहारमधील काही ठिकाणी मर्यादित स्वरूपात पेपफुटी झाल्याचे म्हणत न्यायालयाने संपूर्ण परीक्षा रद्द करण्यास नकार दिला.

राजस्थानच्या विशेष कार्यवाही पथकाने डेहराडून, सीकर आणि झुंझुनू येथून संशयितांना ताब्यात घेतले असून या प्रकरणात कोचिंग संस्थेशी संबंधित एका समुपदेशकाचाही समावेश आहे. त्याचप्रमाणे केरळमधील एका एमबीबीएसच्या विद्यार्थ्याने १ मे रोजी सीकरमधील मित्राला गेस पेपर पाठवल्याची माहिती आहे. या प्रकरणात जयपूरमधून 'मनीष' नावाच्या संशयिताला अटक केली आहे. तो पेपरफुटीचा मुख्य सूत्रधार असल्याचा संशय व्यक्त आहे. त्याने प्रश्नपत्रिका छापण्यापूर्वीच संभाव्य प्रश्नांची माहिती मिळवली होती, अशी माहिती आहे. फुटलेल्या पेपरची पहिली प्रत नाशिकमध्ये तयार झाली होती. त्यानंतर ती हरियाणामार्गे इतर राज्यांमध्ये पाठवण्यात आल्याची माहिती सांगितली जात आहे. नाशिक पोलिसांनी एका ३० वर्षीय संशयिताला ताब्यात घेतले आहे. त्याने हा पेपर १५ लाख रुपयांत पेपर विकल्याचा आरोप आहे. याबाबत नाशिक पोलीस उपयुक्त किरण चव्हाण म्हणाले की, आज सकाळी राजस्थान पोलिसांनी एका व्यक्तीला अटक करण्याची विनंती केली होती. त्यानंतर कारवाई करत आम्ही एका ३० वर्षीय तरुणाला अटक केली. आता त्याचा ताबा राजस्थान पोलीस घेणार आहेत.

लोकसभेचे विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी या प्रकरणावरून सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले की, नीट २०२६ परीक्षा रद्द झाल्याने २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची मेहनत, त्याग आणि स्वप्ने या भ्रष्ट भाजपाई व्यवस्थेने चिरडली आहेत. काहींच्या वडिलांनी कर्ज घेतले, आईने दागिने विकले, लाखो विद्यार्थ्यांनी रात्रभर जागून अभ्यास केला पण त्यांच्या वाट्याला केवळ पेपरफुटी, सरकारी दुर्लक्ष आणि शिक्षण क्षेत्रातील संघटित भ्रष्टाचार आला. हे केवळ अपयश नाही, तर युवकांच्या भवितव्याशी केलेला गुन्हा आहे. जर एखाद्याचे नशीब मेहनतीने नव्हे, तर पैसा आणि प्रभावाने ठरत असेल, तर शिक्षणाला अर्थ तरी काय उरेल? पंतप्रधानांचा तथाकथित 'अमृतकाळ' देशासाठी 'विषकाळ' बनला आहे.

काँग्रेसने आरोप केला की, नीट परीक्षेचा पेपर लीक झाल्यामुळे परीक्षा रद्द करावी लागली. पेपर रद्द होण्याची ही पहिलीच वेळ नाही. तर मोदी सरकारच्या गेल्या १० वर्षांत ८९ पेक्षा अधिक पेपर फुटीच्या घटना घडल्या आहेत. पेपर फुटी आणि परीक्षांमधील गैरप्रकार हीच आता भाजपा सरकारची ओळख बनली आहे. दरवर्षी लाखो विद्यार्थ्यांची स्वप्ने तुटतात, त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होते. मात्र त्यांची वेदना भाजपा नेत्यांना दिसत नाही, कारण त्यांच्या मुलांचे शिक्षण परदेशात सुरू आहे.

आप'चे राष्ट्रीय अध्यक्ष अरविंद केजरीवाल म्हणाले की, या देशात नेमके काय चालले आहे? जे लोक एक परीक्षा नीट घेऊ शकत नाहीत, ते सरकार कसे चालवणार? लाखो मुलांच्या आयुष्याशी हे सरकारचा खेळ चालला आहे. ही सरकार फक्त 'जनआंदोलन'ची भाषा समजते आणि मी या विद्यार्थ्यांसोबत आहे.

शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनीही एक्स पोस्ट करून म्हटले की, पेपर लीक झाल्याने नीट परीक्षा रद्द करून चौकशीचे आदेश दिल्याबद्दल एनटीएचे आभार .परंतु पेपर फुटीनंतर जाग्या होणाऱ्या यंत्रणा अगोदर नेमके काय करतात? हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. परीक्षा रद्द झाल्यावर विद्यार्थ्यांना पालकांना होणारा मनस्ताप लक्षात घेता गैरप्रकार होणार नाहीत याची अगोदरच काळजी का घेतली जात नाही?

## अभिषेक सिंह कोण आहेत?

नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) चे नवनियुक्त महासंचालक अभिषेक सिंह हे यावर्षी एप्रिल महिन्यात पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या महिनाभरातच वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत . यापूर्वी ते कृत्रिम बुद्धिमत्ता या 'इंडियाएआय' मोहिमेचे मुख्य कार्यकारी अधिकारी होते . राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राचे महासंचालक आणि 'मायगव्ह'चे प्रमुख म्हणून काम पाहिले आहे. डिजिटल प्रशासनातील अनुभव असलेल्या सिंह यांच्यावर परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याची मोठी जबाबदारी सोपवण्यात आली होती. दरम्यान, इंडियाएआय परिषदेदरम्यान युनिट्री गो२ या रोबोटिक कुत्र्याची निर्मिती इंडिया ए आय कंपनीने केला असा दावा करण्यात आला. मात्र हे चिनी उत्पादन आहे हे लगेचच उघड झाल्याने मोठी नाचक्की झाली. या वादामुळेही त्यांचे नाव चर्चेत आले होते. त्यानंतर त्यांची बदली करण्यात आली.

# सायबर सुरक्षेबाबत अमित शहा यांची पोस्ट

■ नवी दिल्ली

**देशात** वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एक्सवरून माहिती दिली.

अमित शहा यांनी एक्सवर लिहिले की, मोदी सरकार सायबर सुरक्षित भारत उभारण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. सायबर फसवणुकीत वापरली जाणारी बनावट किंवा संशयित बँक खाती शोधून काढण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.गृह मंत्रालयाच्या भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राने रिझर्व्ह बँक नवोपक्रम केंद्रासोबत सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे सायबर गुन्हे रोखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येणार आहे. सायबर फसवणुकीत अनेकदा म्युल खाते वापरली जातात. ही अशी बँक खाती असतात, ज्यांचा वापर फसवणुकीतून मिळालेला पैसा लपवण्यासाठी किंवा इतर खात्यांमध्ये वळवण्यासाठी केला जातो. अनेक वेळा खातेदारांनाही आपल्या खात्याचा गैरवापर होत असल्याची कल्पना नसते. त्यामुळे अशा खात्यांचा शोध घेणे तपास यंत्रणांसाठी मोठे आव्हान ठरत होते. आता कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणालीच्या मदतीने संशयित खात्यांची माहिती जलदगतीने तपासली जाईल. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राकडे असलेली संशयित खात्यांची माहिती या नव्या प्रणालीला दिली जाणार आहे.

# पुण्यात मंडप साहित्याच्या गोदामाते आग अर्ध्या तासाने नियंत्रणात

■ पुणे

**पुणे** शहरातील अप्पर डेपो परिसरात मंगळवारी दुपारी भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत मंडप साहित्य ठेवलेल्या गोदामाचे मोठे नुकसान झाले असून संपूर्ण साहित्य जळून खाक झाले.

दुपारी सुमारे १.१५ वाजताच्या सुमारास अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाला आग लागल्याची माहिती मिळाली. सुरुवातीला दोन अग्निशमन गाड्या घटनास्थळी पाठवण्यात आल्या; मात्र गोदामात मोठ्या प्रमाणावर ज्वलनशील मंडप साहित्य असल्याने आग झपाट्याने पसरली. परिस्थिती गंभीर होताच आणखी गाड्या पाचारण करण्यात आल्या. अखेरीस सुमारे १० अग्निशमन गाड्यांच्या मदतीने अर्ध्या तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात आली.

या परिसरात दाट लोकवस्ती असून शेजारील दुकाने आणि इमारतींना आग लागण्याचा धोका निर्माण झाला होता. आगीच्या वेळी गोदामात कामगार राहत असल्याने तेथे ठेवलेल्या घरगुती गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. आगीमुळे पाच मोटारसायकली आणि एक टेम्पो जळून खाक झाले.

# वीस दिवस उलटले तरी बिबट्या मोकाट

■ शहापूर

**शहापूर** तालुक्यातील डोळखांब वनपरिक्षेत्रात गेल्या वीस दिवसांपासून बिबट्याचा मुक्त वावर सुरूच असून नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. २१ एप्रिल रोजी कलभोंडे गावातील १० वर्षीय मुलाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी वारंवार निवेदने आणि तक्रारी करूनही संबंधित बिबट्याला पकडण्यात वन विभागाला अद्याप यश आलेले नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. त्यामुळे प्रशासनाविरोधात नाराजी वाढत आहे. डोळखांब परिसरातील आदिवासी आणि ग्रामीण कुटुंबांचा उदरनिर्वाह मोठ्या प्रमाणावर जंगलावर अवलंबून आहे. करवंदे, आंबे, आवळा, जांभूळ यांसारखी वनउत्पादने गोळा करून विक्री करून अनेक कुटुंबे आपला संसार चालवतात. मात्र बिबट्याच्या भीतीमुळे नागरिक जंगलात जाण्यास धजावत नसल्याने त्यांचा रोजगार पूर्णपणे ठप्प झाला आहे. यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले असून प्रशासनाने तत्काळ कारवाई करून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या इमारतीचे उद्‍घाटन

■ पनवेल

**सर्व** समाजाचे प्रेरणास्थान, गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने दर्जेदार शिक्षण देणाऱ्या आणि नावलौकिक असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या इमारतीचा उदघाटन सोहळा महाराष्ट्राचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार १३ मे रोजी सायंकाळी ०६.३० वाजता उलवे नोड मधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर मैदानावर भव्य स्वरूपात होणार आहे.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे वने मंत्री गणेश नाईक, महिला व बाल कल्याण मंत्री आदितीताई तटकरे, रोजगार हमी फलोत्पादन व खार जमीन विकास मंत्री भरतशेठ गोगावले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व रायगड लोकसभा खासदार सुनिल तटकरे, मावळ लोकसभा खासदार श्रीरंग बारणे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार रविशेठ पाटील, आमदार डॉ. विश्वजित कदम, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार निरंजन डावखरे, आमदार विक्रांत पाटील, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी खासदार धैर्यशिल पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या विशेष सोहळ्यास पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक हितचिंतकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीचे अध्यक्ष आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते व समितीचे कार्याध्यक्ष जे. एम. म्हात्रे आणि लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# वसईत रिक्षा मीटरची घोषणा कागदोपत्रीच

**वसई** - वसईत मीटर नुसार रिक्षा भाडे आकारण्याची घोषणा कागदोपत्रीच ठरली आहे. ६ महिन्यांपूर्वी मोठा गाजावाजा करून मीटर रिक्षा सेवा सुरू करण्यात आली होती. परंतु रिक्षाचालकांनी या आदेशाकडे दुर्लक्ष करून मनमानी पध्दतीने भाडे आकारणी सुरूच ठेवली आहे. वसई विरार मधील रिक्षाचालक भाडे मीटर प्रमाणे न आकारता अवाजवी भाडे आकारत होते. याबाबत सतत नागरिकांच्या तक्रारी येत होत्या. मागील वर्षीवसईच्या आमदार स्नेहा दुबे- पंडित यांनी वसईत मीटर रिक्षा सुरू करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार १५ नोव्हेंबर रोजी हिरवा झेंडा दाखवून या मीटर रिक्षा सेवेचा प्रारंभ करण्यात आला होता. वसईत मीटर रिक्षा सुरू झाल्याची जोरदार जाहिरातबाजी भाजप कार्यकर्त्यांनी सुरू केली होती.

# मोदी यांच्या आवाहनाचा ठाण्यात जितेंद्र आव्हाडांकडून अनोखा निषेध

■ ठाणे -

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वैयक्तिक वाहनांचा वापर कमी करून सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करण्याचे आवाहन केल्यानंतर राज्यात त्यावर राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने ठाण्यात आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात आमदार जितेंद्र आव्हाड यांनी घोड्यावर स्वार होत अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला आणि घोषणाबाजी केली.

यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी मोदींच्या आवाहनावर टीका करताना म्हटले की, पूर्वी लोक घोड्यावरून आणि बैलगाडीतून प्रवास करत होते.पंतप्रधान मोदी आपल्याला पुन्हा एकदा दोन हजार वर्षे मागे घेऊन जाऊ पहात आहेत.आता मंत्र्यांना पण आम्ही सांगणार की मंत्रालयात जाताना घोड्यावर जा, बैलगाडीवर जा,कारण मोदींनी सांगितले आहे. आपण मोदींचे ऐकलेच पाहिजे. मंत्र्यांनीही मग मंत्रालयात जाताना घोडा किंवा बैलगाडी वापरावी. स्वयंपाकात तेल कमी वापरण्याच्या मोदींनी दिलेल्या सल्ल्याची खिल्ली उडवताना आव्हाड म्हणाले, महाराष्ट्रात सर्वात जास्त तेल तर भाजपाचे चंद्रकांत पाटील वापरतात.

६

# चंदेरी च्विंगम

पुणे । बुधवार
१३ मे, २०२६

नवाकाळ

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in



## 'बालन द बॉय' येणार पुढील महिन्यात

**कान्स** चित्रपट महोत्सवाच्या धामधुमीत भारतीय चित्रपटसृष्टीची मान उंचावणारी एक महत्त्वाची घडामोडी समोर आली आहे. 'बालन द बॉय' या बहुप्रतिक्षित चित्रपटाने प्रदर्शनाची अधिकृत तारीख जाहीर केली असून, हा चित्रपट १९ जून २०२६ रोजी जगभरातील प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. जागतिक व्यासपीठ उपलब्ध झाले असून, तेथ-ील चित्रपट बाजारपेठेत हा चित्रपट आंतरराष्ट्रीय वितरकांचे लक्ष वेधून घेईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या चित्रपटातून मांडण्यात आलेला विषय जागतिक दर्जाचा असल्याने निर्मात्यांनी कान्ससारख्या मोठ्या महोत्सवाची

विशेष म्हणजे, या चित्रपटाचा वर्ल्ड प्रीमियर कान्स चित्रपट महोत्सवातील प्रतिष्ठित अशा 'मार्चे डू फिल्म' विभागात होणार आहे.

या चित्रपटाचे कथानक एका लहान मुलाच्या भावविश्वाभोवती आणि त्याच्या जीवनप्रवासाभोवती गुंफण्यात आले आहे. कान्स महोत्सवातील प्रदर्शनामुळे या चित्रपटाला निवड केल्याचे दिसून येते. भारतीय प्रादेशिक कथेला वैश्विक रूप देण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर दाद मिळाल्यानंतर हा चित्रपट भारतात प्रदर्शित होईल, तेव्हा प्रेक्षकांमध्ये त्याविषयी मोठी उत्सुकता असेल, असा विश्वास चित्रपट विश्लेषकांनी व्यक्त केला आहे.

## चर्चा रणवीरच्या 'व्यवहारा'ची

**अमिष** त्रिपाठी यांच्या जगप्रसिद्ध 'द इम्मॉर्टल्स ऑफ मेलुहा' या पुस्तक त्रयीवर आधारित चित्रपट निर्मितीसाठी अभिनेता रणवीर सिंगने पुढाकार घेतला असून, या गाजलेल्या साहित्यकृतीचे हक्क त्याने तब्बल ४० कोटी रुपयांना विकत घेतल्याची माहिती समोर येत आहे. भारतीय पौराणिक कथांवर आधारित असलेल्या या पुस्तकांवर चित्रपट किंवा वेब मालिका बनवण्याचे प्रयत्न गेल्या अनेक वर्षांपासून सुरू होते, मात्र आता रणवीर सिंगने स्वतः या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी मोठी गुंतवणूक केली आहे.

चित्रपटसृष्टीत या व्यवहाराची जोरदार चर्चा असून भारतीय साहित्यातील एका अत्यंत लोकप्रिय अशा 'ब्रँड'ला मोठ्या पडद्यावर आणण्यासाठी ही आतापर्यंतची सर्वात मोठी रक्कम मानली जात आहे. रण-वीर सिंग हा केवळ या प्रकल्पाचा निर्माता न राहता, तो स्वतः यात मुख्य भूमिका साकारण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे. अमिष त्रिपाठी यांच्या 'मेलुहा' या पुस्तकाने भारतीय वाचकांमध्ये प्रचंड लोकप्रियता मिळवली असून, भगवान शिवाच्या मानवी रूपातील प्रवासाचे हे चित्रण आता चित्रपट स्वरूपात पाहण्यासाठी प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या भव्य प्रकल्पाचे दिग्दर्शन कोण करणार आणि इतर कलाकार कोण असतील, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नसली, तरी रणवीरच्या या पावलामुळे बॉलीवूडमध्ये एका नव्या मोठ्या फ्रँचायझीची नांदी होणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे.



## कार्यकटिबद्ध कृष्णा



**प्रसिद्ध** दिग्दर्शक विक्रम भट्ट यांच्या घरात आनंदाचे वातावरण असून, त्यांची कन्या कृष्णा भट्ट हिने एका गोंडस मुलाला जन्म दिला आहे. नातवाच्या आगमनाने विक्रम भट्ट कमालीचे उत्साही आणि आनंदी आहेत. या आनंदोत्सवाच्या काळातच कृष्णा भट्ट हिच्या जिद्दीची आणि कामाप्रती असलेल्या निष्ठेची एक विशेष गोष्ट समोर आली आहे. आपल्या आगामी 'हॉन्टेड: इकोज ऑफ द पास्ट' या चित्रपटासाठी ती शेवटच्या क्षणापर्यंत कार्यरत होती. अगदी रुग्णालयातील शस्त्रक्रियागृहात (ओटी) जाण्यापूर्वी काही मिनिटे आधीपर्यंत कृष्णा या चित्रपटाच्या तांत्रिक बाबींवर आणि रशेशवर चर्चा करत होती, असे विक्रम भट्ट यांनी आवर्जून सांगितले.

एका बाजूला प्रसूती कळा आणि दुसरीकडे कामाची जबाबदारी असतानाही तिने दाखव-लेली ही धडाडी पाहून स्वतः वडील म्हणून विक्रम भट्ट थक्क झाले आहेत. कृष्णाची ही जिद्द त्यांच्या कुटुंबातील चित्रपट निर्मितीप्रती असलेली निष्ठा अधोरेखित करते.

भट्ट कुटुंब सध्या या नव्या सदस्याच्या स्वागतात व्यग्र असून, सिनेसृष्टीतूनही त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत



## अक्षय-अनीसची जोडी पुन्हा हसवणार!

**बॉलीवूडचा** 'खिलाडी' अक्षय कुमार आणि विनोदी चित्रपटांचे बादशाह मानले जाणारे दिग्दर्शक अनीस बज्मी ही जोडी पुन्हा एकदा प्रेक्षकांना हसवण्यासाठी सज्ज झाली आहे. 'वेलकम' आणि 'सिंग इज किंग' सारखे सुपरहिट चित्रपट दिल्यानंतर, ही जोडी एका धम्माल कौटुंबिक विन-ोदी चित्रपटासाठी एकत्र येत असून, या चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी डिसेंबर २०२६ ची तारीख निश्चित करण्यात आली आहे. अनीस बज्मी सध्या त्यांच्या 'भूल भुलैया ३' च्या यशामुळे चर्चेत असून, अक्षय कुमारसोबतचा हा नवा प्रकल्प एका मोठ्या स्तरावरील 'एंटरटेनर' चित्रपट असेल, असे संकेत मिळत आहेत. या चित्रपटाचे कथानक एका मोठ्या कुटुंबाभोवती फिरणारे असून, त्यात गोंधळ आणि निखळ मनोरंजनाची मेजवानी असेल.

अक्षय कुमारच्या चाहत्यांसाठी ही एक मोठी पर्वणी मानली जात आहे, कारण तो पुन्हा एकदा त्याच्या सर्वात यशस्वी अशा विनोदी शैलीकडे वळत आहे. या चित्रपटाची निर्मिती एका मोठ्या प्रॉडक्शन हाऊसद्वारे केली जाणार असून, डिसेंबरमधील नाताळच्या सुट्ट्यांचा फायदा मिळवण्यासाठी निर्मात्यांनी आतापासूनच तयारी सुरू केली आहे. अद्याप या चित्रपटाच्या शीर्षकाची अधिकृत घोषणा झालेली नसली, तरी या दोन दिग्गजांच्या एकत्र येण्यामुळे सिनेसृष्टीत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.



## आलिया-नवाजुद्दीनचा 'तुंबाड २'

**'तुंबाड २'** मध्ये हा सोहम शाह आणि नवाजुद्दीन सिद्दीकी यांच्या मुख्य भूमिका असलेला चित्रपट ३ डिसेंबर २०२७ रोजी प्रदर्शित होणार आहे. आलियाच्या सहभागामुळे या या चित्रपटाबद्दलची उत्सुकता कमालीची वाढली आहे. 'पेन स्टुडिओज' आणि आलिया भट यांचे समीकरण बॉक्स ऑफिसवर आतापर्यंत अत्यंत यशस्वी ठरले आहे. यापूर्वी 'गंगूबाई काठियावाडी' या चित्रपटाने १०० कोटींहून अधिक कमाई करून चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांची गर्दी खेचून आणली होती, तर 'आरआरआर' या जागतिक स्तरावर गाजलेल्या चित्रपटातही आलियाने विशेष भूमिका साकारली होती. 'तुंबाड २' च्या निमित्ताने ही जोडी यशाची हॅटट्रीक साधणार का, अशी चर्चा चित्रपट वर्तुळात रंगली आहे. 'तुंबाड'च्या पहिल्या भागाने आधीच 'कल्ट क्लासिक'चा दर्जा मिळवला असून, पुन:प्रदर्शनानंतरही या चित्रपटाने मोठे यश मिळवले होते. आता आलियची लोकप्रियता आणि 'पेन स्टुडिओज'ची भक्कम साथ यामुळे या सिक्वेलकडून व्यापार विश्लेषकांना मोठ्या अपेक्षा आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन आदेश प्रसाद करत असून, जयंतीलाल गडा आणि धवल गडा हे या चित्रपटाचे निर्माते आहेत.



## मुख्यमंत्री विजय यांच्या ज्योतिषाची विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती

■ चेन्नई

**तमिळनाडूचे** नवनिर्वाचीत मुख्यमंत्री विजय यांचे ज्योतिषी राधन पंडित वेट्रीवेल यांची सरकारने मुख्यमंत्री कार्यालयात विशेष कर्तव्य अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. वेट्रीवेल यांनी निवडणुकीत विजय यांच्या यशाचा अंदाज अचूक वर्तवला होता.

तमिळनाडू निवडणुकीपूर्वीच टीव्हीकेचा विजय होईल, असे भाकित वेट्रीवेल यांनी व्यक्त केले होते. राज्यपालांच्या सत्तास्थापनेच्या आमंत्रणानंतर वेट्रीवेल यांच्या सल्ल्यानुसार विजय यांनी शपथविधीची वेळही बदलली, असे सांगितले जात आहे. मूळ शपथविधीची वेळ १० मे रोजी दुपारी ३.४५ अशी ठरवण्यात आली होती, मात्र शुभ मुहूर्त लक्षात घेऊन ती सकाळी १० वाजताची करण्यात आली.

वेट्रीवेल हे तमिळनाडूमधील प्रसिद्ध आध्यात्मिक मार्गदर्शक आणि ज्योतिषी मानले जातात. अनेक राजकीय नेते त्यांच्या संपर्कात असल्याचे सांगितले जाते. माजी मुख्यमंत्री जयललिता यांच्यासह अनेक नेत्यांनीही त्यांच्याकडून वेळोवेळी सल्ले घेतले आहेत.

## उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ज्येष्ठांसाठी लोकलमध्ये स्वतंत्र डबा

■ मुंबई

**मुंबईत** लोकलने प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. पश्चिम रेल्वे प्रशासनाने मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर प्रत्येक लोकल ट्रेनमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डबा उपलब्ध करून देण्याच्या कामाला गती दिली आहे.

सद्यस्थितीत ४० लोकल गाड्यांमध्ये ज्येष्ठांसाठी स्वतंत्र डब्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. उर्वरित ६५ लोकल गाड्यांमध्ये ही सुविधा पुढील दहा महिन्यांत पूर्ण केली जाणार असल्याची माहिती पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनित अभिषेक यांनी दिली. गर्दीच्या वेळी गर्दीत ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. याच पार्श्वभूमीवर वांद्रे येथील के. पी. पुरुषोत्तम नायर यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायालयाने रेल्वे प्रशासनाला ज्येष्ठांसाठी स्वतंत्र डब्याची व्यवस्था करण्याचे आदेश दिले होते. या निर्णयानुसार, काही लोकल गाड्यांमधील मालडब्यांचे रूपांतर करून त्यांना ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डब्यांमध्ये बदलण्यात येत आहे. चर्चगेटकडे जाणाऱ्या लोकलमध्ये सातवा डबा हा ज्येष्ठांसाठी राखीव असेल.

## पंतप्रधान मोदींच्या आवाहनावर नंदुरबार, लखनौतील सराफ नाराज

■ मुंबई

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी काल देशवासीयांना किमान एक वर्ष सोने खरेदी न करण्याचे आवाहन केल्यानंतर त्याचे तीव्र पडसाद देशभरात उमटत आहेत. मोदींचे हे आवाहन आमचे नुकसान करणारे आहे, असे सराफा व्यावसायिकांचे म्हणणे आहे. नंदुरबारमध्ये सराफा बाजाराकडे ग्राहकांनी पाठ फिरवल्याने येथील सराफा व्यापाऱ्यांनी मोदींच्या आवाहनावर नाराजी व्यक्त केली. तर उत्तर प्रदेशच्या लखनौमधील सराफा व्यापाऱ्यांनी एक दिवस दुकाने बंद ठेवून आज मोदींच्या भूमिकेचा निषेध केला आहे.

नंदूरबारच्या सराफा बाजारात आज शुकशुकाट दिसून आला. मोदींच्या आवाहनाचा परिणाम येथे ठळकपणे जाणवत होता. त्यामुळे सराफा दुकानदारांमध्ये तीव्र नाराजी दिसून आली.पंतप्रधान मोदी यांनी जनतेला सोने खरेदी न करण्याचे आवाहन करण्याआधी सराफा व्यावसायिकांना विश्वासात घेतले नाही. वर्षभर जर लोकांनी सोने खरेदी केली नाही तर सराफा व्यावसाय ठप्प होईल. या उद्योगात काम करणाऱ्या कारागिरांवर उपासमारीचे संकट ओढवेल, याचा विचार मोदींनी करायला हवा होता, अशा शब्दात येथील सराफा व्यावसायिकांनी नाराजी व्यक्त केली. तर सोलापूर जिल्ह्यातील करमाळातील एका सराफा व्यापाऱ्याने म्हटले की, जनतेला एक वर्ष सोने खरेदी न करण्याचे आवाहन करताना मोदींनी सराफा उद्योगाचा विचारच केला नाही.

## केरळमध्ये मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत वेणुगोपाल आघाडीवर

■ तिरुवअनंतपुरम

**केरळच्या** निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाहीला बहुमत मिळाल्यानंतर मुख्यमंत्रीपदाचा निर्णय रखडला आहे. काँग्रेसचे नेते लोकसभेतील विरोध पक्ष नेते राहुल गांधी यांच्याशी आज झालेल्या चर्चेत दहापैकी सात नेत्यांनी वेणुगोपाल यांच्या नावाला पसंती दिली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे के. सी. वेणुगोपाल हेच मुख्यमंत्री होतील, अशी दाट शक्यता आहे.

राहुल गांधी यांनी राज्यातील अनेक नेत्यांच्या भेटी घेऊन मुख्यमंत्री कोण असावा याबद्दल त्यांची मते जाणून घेतली. यामध्ये संयुक्त लोकशाही आघाडीचे (यूडीएफ) निमंत्रक अदूर प्रकाश आणि केरळ प्रदेश काँग्रेस कमिटीच्या शिस्तपालन समितीचे अध्यक्ष तिरुवंचूर राधाकृष्णन यांचा समावेश होता. राहुल गांधी यांनी काँग्रेसच्या ५ माजी प्रदेशाध्यक्षांची आणि प्रदेश कमिटीच्या ३ हंगामी अध्यक्षांची भेट घेतली. बहुतांश नेत्यांनी मुख्यमंत्रिपदासाठी वेणुगोपाल यांनाच पसंती दर्शवली.



**जागतिक** परिचारिका दिन निमित्त घाटकोपर पूर्व राजावाडी रुग्णालयात साजरा करण्यात आला त्या प्रसंगी राजावाडी रुग्णालयातील कार्यरत असणाऱ्या डॉ. वैद्यकीय अधीक्षिका भारती राजुलवाला, अधिसेविका स्नेहल चंदने, परिसेविका विशाखा पैयनवार आणि सर्व परिचारिकांना शुभेच्छा देण्यात आल्या. त्या प्रसंगी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून ईशान्य मुंबई विभाग क्रमांक ८चा वतीने जागतिक परिचारिका दिन साजरा करण्यात आला

यावेळी विभागप्रमुख सुरेश पाटील यांच्या सूचनेनुसार विभाग संघटिका प्रज्ञा सकपाळ, घाटकोपर पूर्व विधानसभा कार्यालय प्रमुख, डोंबिवली विधानसभा संपर्क प्रमुख, शिव आरोग्य सेना मुंबई जिल्हा सहसमन्वयक,प्रकाश वाणी, विधानसभा संघटक प्रसाद कामतेकर, उपविभागप्रमुख महेश जंगम, शाखा संघटिका क्रांती मोहिते, मनिषा राऊत, विलास लिगाडे, चंद्रकांत हळदणकर, अजिंक्य वाणी आणि शिवसैनिक उपस्थित होते.

## पुण्यात हॉटेलमध्ये ६१ वर्षीय बेपत्ता व्यावसायिकाचा मृतदेह

■ पुणे

**पुणे** शहरातील आपटे रोड परिसरातील एका हॉटेलमध्ये ६१ वर्षीय बेपत्ता व्यावसायिक अशोक जैन हे बेशुद्धावस्थेत आढळून आले. त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले, त्यांनी विषाचे सेवन केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

हॉटेलच्या खोलीचा दरवाजा बराच वेळ ठोठावूनही अशोक जैन यांची आतून कोणतीही प्रतिक्रिया न मिळाल्याने कर्मचाऱ्यांना संशय आला. त्यांनी तत्काळ पोलिसांना कळविले. मृत अशोक जैन हे ८ मे रोजी दुपारी घरातून बाहेर पडले होते. पण रात्रीपर्यंत घरी परतले नाहीत. त्यांचा फोनही लागत नसल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली होती. याप्रकरणी स्वारगेट पोलीस ठाणे येथे बेपत्ता असल्याची तक्रारही दाखल करण्यात आली होती.पोलिसांनी खोलीची झडती घेतली असता एक चिठ्ठी सापडली असून त्यात आर्थिक अडचणींचा उल्लेख आहे.

## अनंत अंबानी यांनी वनतारा आईस्क्रीम ब्रँड लाँच केला

■ मुंबई

**उद्योजक** अनंत अंबानी यांनी 'वनतारा क्रीमरी' हा प्रीमियम आईस्क्रीम ब्रँड लाँच केला आहे. हा ब्रँड भारतीय चवी आणि जुन्या आठवणींनी प्रेरित असून, त्याचे लाँचिंग जिओ वर्ल्ड ड्राइव्ह येथे करण्यात आले.

या ब्रँडखाली एकूण १७ प्रकारचे फ्लेवर्सची आईस्क्रीम बाजारात आणण्यात आली आहेत. त्यामध्ये पेरू, चिली, केसर पेढा, फिल्टर कॉफी आणि लिंबू सोर्बे यांचा समावेश आहे. लहान प्रमाणात तयार केले जाणारे हे आईस्क्रीम उच्च दर्जाच्या



घटकांपासून बनवण्यात आले आहे. यात गीर गायीचे दुधाचा वापर करण्यात आला आहे. लाँचिंगनंतरच या ब्रँडबाबत सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू झाली असून, १०० टक्के क्रूरतामुक्त आईस्क्रीम असे त्याचे वर्णन केले जात आहे.

## इंदिरा गांधींच्या नावाने बनावट बातमी व्हायरल! काँग्रेसचा भाजपवर हल्लाबोल

■ नवी दिल्ली

माजी पंतप्रधान इंदिरा गांधींनी १९६७ मध्ये भारतीयांना सोने खरेदी थांबवण्याचे आवाहन केले होते. अशा आशयाचे वृत्त प्रसिद्ध झाल्याचे एका इंग्रजी वृत्तपत्राचे कात्रण आज व्हायरल झाले होते. मात्र त्या वृत्ताचे कात्रण खोटे असून वृत्तपत्राचे पहिले पान डिजिटलरीत्या बदललेले आहे. ते खोटे असल्याचे संबधित वृत्तपत्राने स्पष्ट केले. यावर काँग्रेसने भाजपावर कडाडून टीका केली.



THE HINDU

Don't buy gold, Indira tells people; appeals for 'national discipline'

Foreign exchange position still critical: Govt.

Gold imports to be curbed further

कात्रणात नमूद आहे की, दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जनतेला कोणत्याही स्वरूपात सोने खरेदी न करण्याचे आणि देशातील सोन्याच्या वापराबाबत राष्ट्रीय शिस्त पाळण्याचे आवाहन केले. त्यांनी दागिने किंवा इतर कोणत्याही स्वरूपात सोने खरेदी करू नये. हा राष्ट्रीय शिस्त आणि त्याग दाखवण्याचा काळ आहे.

या बनावट बातमीच्या कात्रणावर महाराष्ट्र काँग्रेसने एक्सवर पोस्ट केले आहे की, भाजपची 'लाचार' आयटी सेल आपल्या मालकाची उडालेली लक्तरं सावरण्यासाठी आता जीवाचं रान करत आहे. स्वतः चा नाचक्की लपवण्यासाठी फेक न्यूज आणि वृत्तपत्रांची बनावट कात्रणं छापण्याचा कारखानाच त्यांनी उघडला आहे.

## अल्पसंख्याक शाळांतील शिक्षकांना टीईटीतून सूट! हायकोर्टाचा निर्णय


■ छत्रपती संभाजीनगर

**अल्पसंख्याक** शैक्षणिक संस्थांद्वारे चालवल्या जाणाऱ्या शाळांमधील शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असण्याची अट अनिवार्य नसल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील अल्पसंख्याक संस्थांतील शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले की, टीईटी पात्रतेअभावी शिक्षणाधिकाऱ्यांनी नाकारलेले शालार्थ आयडी आणि पदमान्यतेचे प्रस्ताव पुन्हा विचाराधीन घ्यावेत.या प्रकरणात सय्यद अबू झैद सय्यद रफिक, सायली गायकवाड आणि साईनाथ बनसोडे यांची शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती झाली होती. टीईटी उत्तीर्ण नसल्याच्या कारणावरून त्यांच्या नियुक्त्यांना मान्यता नाकारण्यात आली होती. याविरोधात संबंधित शिक्षकांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती.

न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती अजित बी. काडेठाणकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

# नवाकाळ शब्दकोडे–१६०४



**आडवे शब्द –**

२. अहोरात्र कष्ट उपसणे ७. यज्ञातील पवित्र जळण ९. दम, श्वास लागणे ११. शैली १२. धूम्र १३. पदक १४. लहान बाळाला फिरवण्यासाठी असलेली छोटी ढकलगाडी १६. अग्नी १८. कावळा २०. पर्ण २२. अर्धी ओंजळ २३. जे खळांची व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रती वाढो, ×× ×××× ×× ×× ××× २७. शीतल २८. जहाज २९. तळपायाचा टणक भाग ३०. घाई ३३. होडी ३४. बारीक ताप, अंग मोडून येणे ३७. आवेश ३८. गाडा ४०. नेत्रांजनाचा प्रकार ४१. कासोटा, पुच्छ, संस्कृतात कासव ४२. दुसऱ्यावर अवलंबून ४४. पुष्पमाला ४७. श्रीकृष्ण ४९. कलंक ५१. रड्या, निराशावादी ५४. कसदार ५६. अवखळ ५७. नातू ५८. मुलाची मुलगी ५९. माळ, मालिका ६०. नुकसान ६१. पलीकडे ६२. पीडा, कटकट ६३. खिन्न, उजाड ६५. योजना ६६. ठीक, बेताचा ६७. ढोंग, भोंदूपणा ७०. बाजू घेणे ७२. भांडण ७३. धाक, दहशत ७४. कोहळ्याची बर्फी ७५. पाणी तापवण्याचे विजेवरचे उपकरण ७६. सिद्धता, सज्जता, संमती ७८. धनलाभाचा योग ७९. दरोडेखोर ८१. पुराणातील एक नाग ८२. सारखा ८३. गुप्तचर ८४. युद्ध ८५. वेतन ८६. छोटी कट्यार ८८. चानी ९०. फळांचा राजा ९२. अस्पष्ट ९४. राजसभा ९७. राहणे, वस्ती करणे ९९. कलंदर १०१. स्पष्टवक्ता १०३. दानव १०५. ठोंब्या १०६. आक्रोश १०७. जुळा, जावळा १०८. प्रहार १०९. अतिरेक ११०. रेषा, रेखा

**उभे शब्द –**

१. पैसे नंतर देण्याच्या बोलीवर केलेली खरेदी २. जनानखाना, अंतःपूर ३. चक्र ४. नवरी ५. शासन ६. युद्धभूमी ७. मसलत ८. महामार्गावरचे भोजनगृह ९. दोरा, सूत्र १०. वापरात नसलेली जमीन १३. मूर्ख, अक्कल नसलेला १५. शिशुशाळा १७. पिवळा कद १९. अतिशय तुच्छ २०. पातक २१. लायकी २२. पंख २३. ऑपरेशनपूर्वी रुग्णाला बेशुद्ध करणारा तज्ज्ञ २४. अब्रू २५. बद्धकोष्ठावरचे औषध २६. शेतीची जनावरे २७. 'वासरात लंगडी ×× ×××' ३१. हनुमान ३२. नौका ३४. लाकूड कापण्याचे साधन ३५. सर्वजण ३६. बिचारा, दीन ३७. अगोदर ३९. हस्त ४३. नृप ४५. तळाचा भाग ४६. बारानंतरचा आकडा ४८. नमुना ५०. पोळीचे धान्य ५१. रमलेला ५२. पूर्वसूचना न देता ५३. छाती ५५. आश्रय ५७. नागरिक ५८. छंद ५९. मोठेपणा ६१. निभाव ६२. लाल मिरचीची लोकप्रिय जात ६३. योगदान देणे, वाढवणे ६४. नेहमी ६६. अधोगती झालेल्या मोठ्या घराण्याचे वर्णन करणारी म्हण – ×× ×× पोकळ वासा ६७. महान ६८. लाल रंग ६९. एखाद्या कसोटीला कसेबसे उतरणे ७०. समशेर ७१. पद्धतशीर ७३. दुर्बोध, पटकन न समजणारे ७७. प्रहर ८०. विहीर ८७. आयुष्य ८८. मिठाची चव ८९. ताकद ९१. चणे ९३. यशस्वी ९४. धान्याचे पीठ करण्याची प्रक्रिया ९५. डझन ९६. रक्षण करणारा ९८. हिस्सा ९९. जिलेबीबरोबरचे मसालेदार ताक १००. वैयक्तिक, खासगी १०२. सोवळ्याचे वस्त्र १०४. बरोबर •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६०३ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. विकसनशील ६. कर्मधर्मसंयोगाने १०. आषाढ ११. मत १२. रेटारेटी १४. मद १५. एकलकोंडा १७. निराळा १८. मणका २१. एकोपा २३. उडी २४. साखर २५. राहू २६. संकट २८. आडदांड २९. सलीम ३१. नगर ३२. सुरमा ३४. नेकी ३७. खोळ ३८. समंजस ४२. वसा ४४. उसासा ४६. एडका ४७. मंडई ५०. खळबळजनक ५१. स्वामी ५२. अधर ५३. चाकर ५४. लवकर ५६. मजा ५७. कारा ५९. पुळी ६१. भव्य ६२. महा ६३. काळीज ६४. लकडा ६६. अनुनय ६८. सुपीक ७०. गवत ७२. रिम ७४. जव ७६. लालसा ७८. सारमेय ८०. कातरवेळ ८१. विहग ८२. कलह ८३. मार ८५. भाष्य ८६. तनू ८९. तास ९१. कणव ९३. वेग ९६. पुळण ९८. लालिमा ९९. सुबत्ता १०१. सटरफटर १०४. नवमी १०५. धाक १०६. दुही १०७. नाट

**उभे शब्द :** १. विषाद २. कढ ३. नमकहराम ४. शीतल ५. खोटा ६. कटी ७. धर्मराज ८. संधी ९. गाळण उडणे १०. आमनेसामने १२. रेडा १३. रेनकोट १६. कोंडी १९. काडी २०. विरस २१. एकर २२. गडगंज २६. संगर २७. भार ३०. लीन ३२. सुळका ३३. मास ३५. कीव ३६. ढिसाळ ३७. खोड ३९. मंद ४०. समंध ४१. भुई ४३. साखरपुडा ४४. उबग ४५. साजरा ४६. एकलव्य ४८. डरकाळी ४९. त्याचा बैल रिकामा ५१. स्वार ५२. अजा ५५. कच्छपी लागणे ५६. महाग ५८. राजसूय ६०. मनुज ६१. भय ६३. कातर ६५. कमतरता ६७. नवल ६९. कल ७१. वसाहत ७३. हवेली ७५. भविष्यवेत्ता ७७. साकव ७९. मेख ८४. ऋण ८७. नूपुर ८८. दणकट ९०. सलामी ९१. कमाई ९२. वसुधा ९४. थेट ९५. वाफ ९७. म्यान १००. बक १०१. सही १०२. रम्य १०३. टप

## या वादापुढे महाभारतही लहान संजय कपूर प्रकरणी टिप्पणी

■ नवी दिल्ली

**दिवंगत** उद्योगपती संजय कपूर यांच्या तब्बल ३०,००० कोटी रुपयांच्या वारसाहक्क आणि मालमत्ता प्रकरणात वाद थांबण्याचे नाव घेत नाही. या प्रकरणात संजय कपूर यांची आई राणी कपूर यांनी 'रघुवंशी इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड'च्या १८ मे रोजी होणाऱ्या बोर्ड बैठकीला स्थगिती देण्याची मागणी करत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ही बैठक न्यायालयाच्या मध्यस्थी आदेशाला बगल देण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. संजय कपूर यांच्या तिसऱ्या पत्नी प्रिया कपूर यांना ट्रस्टच्या कामकाजात हस्तक्षेप करण्यापासून रोखावे, अशीही मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

या प्रकरणावर सुनावणी करताना न्या. जे.बी. पारडीवाला यांच्या खंडपीठाने केलेली तीव्र टिप्पणी सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. 'आम्ही एका आखाड्यात उतरलो आहोत, या वादापुढे महाभारतही खूप लहान वाटेल,' अशा शब्दांत न्यायालयाने प्रकरणातील गुंतागुंत अधोरेखित केली. न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी १४ मे रोजी ठेवली आहे. दुसरीकडे, प्रिया कपूर यांच्या वकिलांनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या 'जैसे थे' स्थिती आदेशाचे समर्थन करत मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी सहकार्य दर्शवल्याचा दावा केला आहे.

## शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी घसरण

■ मुंबई

**भारतीय** शेअर बाजारात आज सलग दुसऱ्या दिवशी घसरण झाली. बाजाराची



सुरुवातच घसरणीने झाली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ३२६.८९ अंकांनी घसरून ७५,६८८.३९ अंकांवर उघडला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ९३.२५ अंकांच्या घसरणीसह २३,७२२.६० अंकांवर उघडला. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांमध्ये आज मोठी पडझड दिसून आली. सेन्सेक्समधील ३० पैकी फक्त ६ कंपन्यांचे समभाग आज वाढीसह उघडले. उर्वरित २४ कंपन्यांना घसरणीचा सामना करावा लागला.निफ्टीबाबतही अशीच स्थिती होती.निफ्टीच्या ५० कंपन्यांपैकी ३६ कंपन्यांमध्ये घसरण तर १४ कंपन्यांमध्ये उघडताना वाढ दिसून आली. टाटा स्टील कंपनीने आज सर्वाधिक ०.४० टक्क्यांची वाढ नोंदवत चांगली सुरुवात केली.

## अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश

■ मुंबई

**राज्यात** अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांविरोधात परिवहन विभागाने कठोर भूमिका घेतलीआहे. ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या ॲपआधारित सेवांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सायबर गुन्हे विभागाला पत्र पाठवत या अनधिकृत सेवा तात्काळ बंद करण्याचे तसेच संबंधित कंपन्यांच्या मालकांविरोधात गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले. राज्यात गेल्या अनेक महिन्यांपासून विविध ॲप्सच्या माध्यमातून कोणतीही वैध परवानगी, शासनाची मान्यता किंवा परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता प्रवासी वाहतूक सुरू असल्याची माहिती आहे. बाईक टॅक्सी सेवांचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याने सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, या सेवांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेची पुरेशी हमी नाही. चालकांची योग्य पडताळणी, विमा संरक्षण, महिला सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना तसेच आपत्कालीन मदत व्यवस्था अत्यंत अपुरी असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## भाजपाने काँग्रेसला सत्तेवरून खेचायला अण्णाद्रमुक पक्ष फोडला

» पान १ वरून

१०८ जागा जिंकून जरी सर्वात मोठा पक्ष बनला असला तरी बहुमतासाठी ११८ आमदारांची गरज होती. त्यातच विजय हे दोन मतदारसंघातून विजयी झाले असल्याने त्यांना एका मतदारसंघातील आमदारकीचा राजीनामा द्यावा लागणार आहे. त्यामुळे टीव्हीकेकडे १०७ आमदारांचे बळ होते. अशा परिस्थितीत काँग्रेसचे ५, भाकपा आणि माकपाचे प्रत्येकी २, व्हीसीके पक्षाचे २ आणि इंडियन युनियन मुस्लीम लिगचे २ आमदार यांच्या पाठिंब्यावर विजय थलापती यांनी कसातरी बहुमताचा आकडा गाठून सरकार स्थापन केले. भाजपाला तामिळनाडूमध्ये फारसे स्थान नाही. भाजपाचा केवळ एक उमेदवार येथे विजयी झाला आहे. साहजिकच सत्तास्थापनेमध्ये भाजपाला खास काही करता येणे शक्य नव्हते.

विजय यांच्या शपथविधी सोहळ्याला त्यांचे लाखो चाहते स्वतःहून हजर राहिले होते. त्या दिमाखदार शपथग्रहण सोहळ्यात मंचावर विजय यांच्यासोबत राहुल गांधी होते. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. मात्र त्यानंतर काही मिनिटांतच तो व्हिडिओ सोशल मीडियावरून गायब करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आदेशावरून तो व्हिडिओ सोशल मीडियावरून हटवण्यात आला, अशी चर्चा त्यानंतर सुरू झाली होती.

आज अण्णा द्रमुक मध्ये फूट पडताच पुन्हा भाजपाकडेच संशयाने पाहिले जात आहे. काहीही करून काँग्रेसला सत्तेतून हटवण्यासाठी भाजपानेच ही फूट घडवून आणली, अशी चर्चा सुरू झाली आहे.

## एक महिन्यात मराठी पाट्या लावा पालिकेकडून पुन्हा एकदा नवी मुदत

» पान १ वरून

असली तरी मराठी फलक अनिवार्य करण्यात आला आहे. पालिकेच्या दुकाने व आस्थापने विभागाकडून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू असली तरी अनेक ठिकाणी अजूनही इंग्रजी पाट्या दिसून येत आहे. काही ठिकाणी इंग्रजी नाव मोठ्या अक्षरांत आणि मराठी नाव अत्यंत लहान अक्षरांत लिहिले जात असल्याची बाबही उघड झाली आहे. ही बाब सहन केली जाणार नाही आणि मराठी फलक ठळकपणे असणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, पालिकेकडून वारंवार मराठी पाट्या लावण्याचे आवाहन केले जाते. मात्र त्यानंतर अंमलबजावणीकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका राजकीय वर्तुळातून केली जात आहे. प्लास्टिक बंदीबाबतही अशीच परिस्थिती आहे. नियम जाहीर केले जातात, पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणीच होत नाही. त्यामुळे प्रत्येकवेळी प्रशासनाला आठवण करून द्यावी लागते का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## सुधारित पेन्शन योजनेत त्रुटी

» पान १ वरून- केले आहे. बैठकीदरम्यान शासनासमोर ठोस आणि तांत्रिकदृष्ट्या भक्कम मांडणी करण्यासाठी हा उपक्रम हाती घेतल्याची माहिती महासंघाचे सरचिटणीस समीर भाटकर यांनी दिली. ६ मेच्या शासन निर्णयातील त्रुटी ओळखून त्यावर सुधारणा सुचविणे, जुनी पेन्शन योजना व सुधारित योजनेतील फरक स्पष्ट करणे, तसेच कर्मचाऱ्यांना होऊ शकणाऱ्या संभाव्य नुकसानीवर प्रकाश टाकणे, या मुद्यांवर बैठकीत चर्चा होणार आहे. याशिवाय राज्य सेवेतील अधिकाऱ्यांच्या इतर प्रलंबित प्रश्नांवरही तोडगा काढण्याचा महासंघाचा प्रयत्न आहे. या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करत महासंघाने सर्व पदाधिकारी व प्रतिनिधींना आपल्या कार्यक्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करून लेखी सूचना १४ मेपर्यंत ई-मेलद्वारे पाठवण्याचे निर्देश दिले आहेत.


**फॉर्म ए**
**जाहीर घोषणा**
(इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)

**अर्शिया ३पीएल सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशिल | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **अर्शिया ३पीएल सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | २७ ऑगस्ट २०१८ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | कंपनी निबंधक - मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U74999MH2018PTC313041 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | अर्शिया एफटीडब्ल्यूझेड, सीओ-१, सर्वे क्र.१७८/३ आणि १७८/४, मु.पोस्ट- साई गाव, साई पनवेल रायगड (एमएच) - ४१०२२१ महाराष्ट्र |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | ०८ मे २०२६ (आदेश ११ मे, २०२६ रोजी प्राप्त झाली) |
| ७. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | ०४ नोव्हेंबर २०२६ (सीआयआरपी प्रारंभ दिनापासून १८० दिवस, म्हणजेच ०८ मे, २०२६) |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | **मनिष लालजी दावडा** IBBI/IPA-001/IP-P-02506/2021-2022/13797 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | २०५ ए, २रा मजला, हिरेन लाइट इंडस्ट्रियल इस्टेट, जॉन्सन अँड जॉन्सनच्या मागे, मोगल लेन, भागोजी खीर मार्ग, माहीम पश्चिम, मुंबई ४०००१६ |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल | २०५ ए, २रा मजला, हिरेन लाइट इंडस्ट्रियल इस्टेट, जॉन्सन अँड जॉन्सनच्या मागे, मोगल लेन, भागोजी खीर मार्ग, माहीम पश्चिम, मुंबई ४०००१६ प्रक्रिया ईमेल आयडी: cirp.arshiya3pl@gmail.com |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | २५ मे २०२६ (सीआयआरपी आदेश प्राप्त झाल्यापासून १४ दिवस, म्हणजेच ११ मे २०२६) |
| १२. | कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग | लागू नाही |
| १३. | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | (अ) https://ibbi.gov.in/home/downloads (ब) लागू नाही |

येथे सूचना देण्यात येत आहे की,
१. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने दिनांक ०८ मे २०२६ रोजी अर्शिया ३पीएल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
२. अर्शिया ३पीएल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना येथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यांसह २५.०५.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी बाब क्र.१० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत.
३. वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.
दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

ठिकाण: मुंबई
दिनांक: १३.०५.२०२६

सही/-
**मनीष लालजी दावडा**
अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल
IBBI/IPA-001/IP-P-02506/2021-2022/13797
एए१/१३७९७/०२/३००६२६/१०८२७०, वैधता ३०.०६.२०२६ पर्यंत
**नोंद.:** २०५ ए, २रा मजला, हिरेन लाइट इंडस्ट्रियल इस्टेट, जॉन्सन अँड जॉन्सनच्या मागे, मोगल लेन, भागोजी खीर मार्ग, माहीम पश्चिम, मुंबई ४०००१६
**नोंदणीकृत ईमेल आयडी:** ip.dawdamanish@gmail.com, **प्रक्रिया ईमेल आयडी:** cirp.arshiya3pl@gmail.com


## भाजपा नेते अमित साटमांच्या दौऱ्यात २५ वाहनांचा ताफा

» पान ८ वरून

टीका केली. ते म्हणाले की, पंतप्रधान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला २५ गाड्यांच्या ताफ्याने प्रतिसाद दिला आहे. कदाचित या गाड्या पाण्यावर चालत असाव्यात. सत्ताधाऱ्यांची अवस्था 'लोका सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण'अशी झाली आहे. या टिकेनंतर अमित साटम म्हणाले की, जनतेच्या कामासाठी वेळेची बचत करणे देखील महत्त्वाचे आहे. एकाचवेळी अनेक नाल्यांची पाहणी करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधी आणि महापालिका अधिकारी एकत्र फिरत होते. रस्त्यावरची ट्रॅफिकमधील वाहने मोजून ती अमित साटम यांचा ताफा म्हणणे ही तुमची केविलवाणी मानसिकता आहे. घरात बसून शब्दांचे फुलोरे सोडण्यापेक्षा कधीतरी लोकांच्या समस्या जाणून घ्या म्हणजे ७ किंवा २५ मधील फरक समजेल.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the Public at large on behalf of my clients Mr. Salden Bona Ferreira, Mrs. Anna Salden Ferriera, Mr. Jordon Inas Kamaidar and Mr. Godson Inas Kamaidar, who are being an intended purchasers of the immovable property mentioned in the schedule-I herein below.

The property is owned by Mr. Quinton Moses D'Souza and Mr. Constan Moses D'Souza by virtue of Release Deed dated 07/06/2024 and are desire to sell and transfer and convey all the Title, Rights, Interest in respect of the property under reference in exchange of immovable property viz. being piece & parcel of land bearing Survey No. 44 Hissa No.1 area admeasuring each 200 sq.mtrs + 200 sq. mtrs = Total 400 sq.mtrs out of total area admeasuring 0.08.60 Gunthas (H.R. Sq. Meter) corresponding to CTS No. 1527 being lying and situate at Village-Manori, Taluka Borivali, District - Mumbai Suburban which was sold by the said owner alongwith the other Co-owners namely Caster Moses D'Souza and Godwin Moses D'Souza. All the persons, Organization including legal heirs, having any Claim, Right, Title, Interest or objections, Charge, Encumbrances over the said Property mentioned in the schedule shall inform the undersigned in writing along with supporting proofs within a period of 7 days from the date of publication of this notice failing which any such claim by anyone shall not be considered and the transaction will be proceeded.

**Schedule of the Property**

All that piece and parcel land area admeasuring 228 sq. mtr as per 7/12 extract and admeasuring 348.80 sq.mtr as per PRC or thereabouts bearing Survey No. 44, Hissa No. 6 corresponding to CTS No. 1528 and CTS No. 1529 of Village Manori, Taluka Borivali, in the registration district and sub-district of Mumbai City and Mumbai Suburban situate at Manori, Malad (West), Mumbai 400095.

Date: 13/05/2026
Place: Mumbai

Sd/-
**Premchand R. Pal,**
**Advocate for the Purchasers**
Manori Village, Malad West, Mumbai-400095
Contact No. 9821565325


## अग्निवीरांना सैनिकांप्रमाणे पेन्शन लाभांवर दावा करता येणार नाही

» पान १ वरून

नाईक यांच्या वतीने युक्तिवाद केला. नियमित सैनिक ज्या प्रकारची सेवा देतात आणि जेवढी जोखीम उचलतात तशीच सेवा आणि तेवढीच जोखीम अग्निवीर उचलतात, असे असताना अग्निवीरांना सैनिकांसारखे लाभ का दिले जात नाहीत, असा सवाल याचिकाकर्त्याने विचारला होता.

त्याला प्रत्युत्तर देताना केंद्र सरकारने सांगितले की, अग्निवीर आणि नियमित सैनिक यांच्यात समानता नाही. अग्निवीरांची नियुक्ती चार वर्षांच्या निश्चित कालावधीसाठी केली जाते. तर निवृत्तीवेतन आणि अन्य लाभ हे दीर्घकालीन सेवेशी जोडलेले आहेत. शपथपत्रात पुढे असेही म्हटले आहे की, याचिकाकर्त्याने (मुरली नाईक) अग्निवीर म्हणून नियुक्ती होताना संबंधित अटी मान्य केल्या होत्या. त्यामुळे आता त्याच्या वतीने कुटुंबियांना सैनिकांप्रमाणे लाभ मागता येणार नाहीत.


**Notice is hereby given that below mentioned equity shares held in physical form have been lost: -**

| Folio No &Name Of Company | Name of Shareholder | Certificate No. | Dist. Nos. | No. of Shares |
|---|---|---|---|---|
| Folio No.K00225 G. M. Breweries Ltd | Kalpana Sankhe & Kashinath Sankhe | 00069659, 00071517 | 11650384 To 11650633 14565555 To 14565866 | 250 312 |

Any Person(s) has/have any claim in respect of the aforesaid share certificate(s) should lodge such claim with the Company G. M. Breweries Ltd Ganesh Niwas, S. Veer Savarkar Marg, Prabhadevi, Mumbai - 400025 or its Registrar and Transfer Agents Purva Sharegistry (I) Pvt. Ltd. Unit No. 9, Ground Floor, Shiv Shakti Ind. Estt, J. R. Boricha Marg, Lower Parel East, Shastri Nagar, Adarsh Nagar, Worli, Mumbai – 400011. within 15 days of publish of this Notice. After which no claim will be entertained and the company may proceed to issue duplicate share certificate(s).

PLACE: MUMBAI DATE: - 13/05/2026



**बैद इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)**
U17100GJ2007PTC050851
नोंदणीकृत पत्ता: प्लॉट क्र.८, जी.आय.डी.सी. पानोली, अंकलेश्वर, गुजरात, भारत - ३८४११६.

**नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ अंतर्गत ई-लिलाव विक्री सूचना**

नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांनुसार, **मे. बैद इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)** यांचे यंत्र व सामग्री आणि जमीन व इमारत यांच्या विक्रीसाठी, इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) नियम, २०१६ च्या नियम ३२ आणि ३३ नुसार, याद्वारे सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे. आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या नियम ३३ अंतर्गत अनुसूची १ नुसार, खालील बाबींसाठी विक्री माध्यद्वारे https://baanknet.com//login या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे आयोजित केली जाईल:

| ब्लॉक | मालमत्ता | तपशिल | आरक्षित मूल्य (रु.) | इरठे रक्कम (रु.) | वाढीव मूल्य (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| ए | **जमीन आणि इमारत तसेच संयंत्र आणि यंत्रसामग्री** | **साईटचा पत्ता:** प्लॉट क्र.८, जी.आय.डी.सी. पानोली, अंकलेश्वर, गुजरात, भारत - ३८४११६ | 18,70,00,000.00 | 1,87,00,000.00 | 5,00,000.00 |
| बी | **केवळ संयंत्र आणि यंत्रसामग्री** | **साईटचा पत्ता:** प्लॉट क्र.८, जी.आय.डी.सी. पानोली, अंकलेश्वर, गुजरात, भारत - ३८४११६ | 2,75,00,000.00 | 27,50,000.00 | 5,00,000.00 |
| सी | **केवळ जमीन आणि इमारत** | **साईटचा पत्ता:** प्लॉट क्र.८, जी.आय.डी.सी. पानोली, अंकलेश्वर, गुजरात, भारत - ३८४११६ | 15,95,00,000.00 | 1,59,50,000.00 | 5,00,000.00 |

| | |
|---|---|
| आवश्यक अर्ज, प्रतिज्ञापत्रे, घोषणापत्र इत्यादी बान्कनेट पोर्टलवर सादर करणे | १३.०५.२०२६ ते २६.०५.२०२६ |
| स्थळभेट / तपासणीची तारीख | १३.०५.२०२६ ते २६.०५.२०२६ |
| इरठे सादर करण्याची अंतिम तारीख | २६.०५.२०२६ |
| ई-लिलावाची तारीख आणि वेळ | |
| ब्लॉक ए-जमीन आणि इमारत, सोबतच संयंत्र आणि यंत्रसामग्री | तारीख: २८.०५.२०२६, वेळ: दु.०१:३० ते ०२:३० भाग्रवे |
| ब्लॉक बी-फक्त संयंत्र आणि यंत्रसामग्री | तारीख: २८.०५.२०२६, वेळ:दु.०३:०० ते ०४:०० भाग्रवे |
| ब्लॉक सी-फक्त जमीन आणि इमारत | तारीख: २८.०५.२०२६, वेळ: दु.०४:३० ते ०५:३० भाग्रवे |

**ई-लिलाव सेवा प्रदाता: बान्कनेट**
**ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत:**
१. ई-लिलाव **जसे आहे जेथे आहे, ज्या स्वरूपात आहे त्याच स्वरूपात, कोणत्याही दाव्याशिवाय आणि जे काही उपलब्ध आहे त्या आधारावर** मंजूर सेवा प्रदाता, बान्कनेट यांच्यामार्फत आयोजित केला जाईल. ही ई-लिलाव सूचना, मालमत्तेचा तपशील, ई-लिलाव बोली अर्ज, घोषणा आणि हमीपत्रे, ई-लिलाव विक्रीच्या सामान्य अटी व शर्ती यांचा समावेश असलेल्या संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवजासोबत वाचली जावी, जो ई-लिलाव सेवा प्रदात्याच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिला जाईल.
२. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्ता आणि तपशिलांची पाहणी करून स्वतःची खात्री करून घेणे ही बोलीदारांची जबाबदारी असेल. लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तांची पाहणी करण्यास इच्छुक बोलीदारांना **१३.०५.२०२६ ते २६.०५.२०२६** या कालावधीत संबंधित ठिकाणी परवानगी दिली जाईल.
३. इच्छुक बोलीदाराने ई-लिलावात सहभागासाठीचे विनंती पत्र, केवायसी आणि मालमत्तेचा तपशील, ई-लिलाव बोली अर्ज, घोषणापत्र व हमीपत्रे, ई-लिलाव विक्रीच्या सामान्य अटी व शर्ती आणि इतर आवश्यक कागदपत्रांसह संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवज 'बान्कनेट' पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. ही कागदपत्रे सादर करण्याची अंतिम मुदत **२६ मे, २०२६** आहे.
४. आवश्यक कागदपत्रांचे नमुने बान्कनेट पोर्टलवरील ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजात उपलब्ध आहेत. आवश्यक अर्ज, प्रतिज्ञापत्रे, घोषणापत्र इत्यादी https://baanknet.com या ई-लिलाव पोर्टलवर सादर करावेत.
५. इरठे हे https://baanknet.com या ई-लिलाव पोर्टलद्वारे जमा करणे आवश्यक आहे. इच्छुक बोलीदारांनी इसारा रक्कम ठेव (इरठे) https://baanknet.com या ई-लिलाव पोर्टलद्वारे जमा करणे आवश्यक आहे, **इरठे सादर करण्याची अंतिम तारीख २६ मे, २०२६** आहे.
६. बोलीदारांना विनंती आहे की, बोली सादर करण्यापूर्वी आणि ई-लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी, ई-लिलाव प्रक्रियेच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी https://baanknet.com/ या वेबसाईटला भेट द्यावी.
७. जर ब्लॉक ए चा लिलाव यशस्वीरित्या पार पडला, तर ब्लॉक बी आणि ब्लॉक सी चे लिलाव रद्द केले जातील.
८. जर ब्लॉक ए चा लिलाव यशस्वीरित्या पार पडला नाही, तर ब्लॉक बी चा लिलाव घेतला जाईल.
९. जर ब्लॉक बी चा लिलाव यशस्वीरित्या पार पडला, तरच ब्लॉक सी चा लिलाव घेतला जाईल. जर ब्लॉक बी चा लिलाव यशस्वीरित्या पार पडला नाही, तर ब्लॉक सी चा लिलाव घेतला जाणार नाही.

**आयपी जयकिशन राठी, परिसमापक,**
**बैद इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड –** परिसमापनात,
**नोंदणी क्र.:** IBBI/IPA-001/IP-P-02710/2022-2023/14166,
दिनांक: १३.०५.२०२६
ठिकाण: गुजरात
**पत्ता:** ३०४०, ३रा मजला, ट्रेड हाऊस, ऋषभ पेट्रोल पंप जवळ, रिंग रोड, सुरत, गुजरात, ३९५००२., **ई-मेल:** baid.cirp@gmail.com

# परदेश दौरे टाळण्याचे आवाहन करणारे पंतप्रधान मोदी ५ देशांच्या दौऱ्यावर



**नवी दिल्ली -** जनतेला परदेश दौरे टाळण्याचे आवाहन करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी सुरू होणाऱ्या सहा दिवसांच्या दौऱ्यात संयुक्त अरब अमिराती, नेदरलँड, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या पाच देशांना भेट देणार आहेत. जागतिक भू-राजकीय घडामोडी आणि सुरू असलेल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारताचे द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्याचा या दौऱ्याचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. मोदी यांच्या दौऱ्याची पहिली भेट १५ मे रोजी युएईला असेल. तेथे ते राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांची भेट घेणार असून भारत-युएई सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्याबाबत चर्चा करणार आहेत. तसेच पश्चिम आशियातील संघर्षावरही दोन्ही नेते विचारांची देवाणघेवाण करतील. मोदी १५ ते १७ मेदरम्यान नेदरलँड्ला भेट देतील. या भेटीत पंतप्रधान मोदी नेदरलँड्चे राजा विलेम-अलेक्झांडर आणि राणी मॅक्सिमा यांची भेट घेतील. तसेच पंतप्रधान रॉब जेटन यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करतील.

## राज ठाकरे यांचे मोदींना पत्र

**मनसेचे** अध्यक्ष राज ठाकरे यांनी पंतप्रधान मोदी यांना लिहिलेले पत्र एक्सवर पोस्ट केले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दोन दिवसांपूर्वी तमाम भारतीयांना काटकसर करण्याचे आवाहन केले. सोने खरेदी कमी करा किंवा जवळपास थांबवाच, परदेशात गरज नसेल तर जाऊ नका, पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करा, विजेवर चालणाऱ्या गाड्या



जास्त वापरा, वर्क फ्रॉम होमचा पर्याय स्वीकारा इत्यादी इत्यादी. हे सगळे का? तर, सोने, पेट्रोल डिझेल हे आयात करावे लागते आणि त्यात विदेशी गंगाजळी मोठ्या प्रमाणावर खर्च होते आणि सध्या इराण युद्धामुळे खनिज तेलाचे भाव प्रचंड वाढलेत. बरे, मग स्वतः पंतप्रधान आणि त्यांचे सगळे सहकारी देशभर काही शेकडो गाड्यांचा ताफा घेऊन मिरवणुका काढत आहेत, स्वतः वर फुले उधळून घेत आहेत त्याचे काय करणार आहात आपण? आमच्याकडून चूक झाली त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून, यापुढे माझ्यासकट कोणीही काही असे करणार नाही असे सांगणार आहात का ? चुका तुमच्या, आणि त्याचा भुर्दंड जनतेला का?

सध्या खनिज तेलाचा आंतरराष्ट्रीय बाजारातील भाव हा साधारणपणे ९० ते १०० डॉलर प्रति बॅरल असा आहे. हा भाव जगाने या आधी कधी पाहिला नाही असे नाही. २००८ ला, पुढे २०११-२०१२ मध्ये अरब स्प्रिंगच्या वेळेस, २०१३-२०१४ च्या काळात ( जेव्हा भाजपावाले खनिज तेलाच्या किमती आणि देशाची इभ्रत यावर तावातावाने बोलत होते तो काळ), पुढे अशीच परिस्थिती २०२२ आणि २०२३ च्या दरम्यान जेव्हा ओपेकने खनिज तेलाचे उत्पादन कमी करण्याचा निर्णय घेतला तेव्हादेखील बॅरलचा भाव ९० ते १०० डॉलर दरम्यान गेला होता. या घटनांपैकी ३ ते ४ वेळा मनमोहन सिंग पंतप्रधान होते आणि एकदा तर स्वतः मोदी पंतप्रधान होते. मनमोहन सिंगांनी असे आवाहन केले नाही की तेव्हा मोदींनी केले नाही. मग आत्ताच का? काटकसर करा, हे आवाहन करताना खरे कारण देशाच्या आणि राज्याराज्यांच्या अर्थव्यवस्थेचे जे काही कंबरडे मोडून ठेवले आहे त्याबद्दल पंतप्रधान काहीच बोलत नाहीत. बरं जेव्हा बॅरलचा भाव ६० ते ६५ डॉलरच्या आसपास होता तेव्हा पण तुम्ही चढ्या भावाने आम्हाला पेट्रोल-डिझेल विकत होतात, त्यावेळेस जे पैसे लोकांकडून घेतले, जे काही लाख कोटी रुपये असतील ते कुठे गेले? त्याचे काय झाले?

ज्या रेवडी संस्कृतीची पंतप्रधानांनी खिल्ली उडवली त्याच रेवड्या मग २०२४ ची महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक असो की त्यानंतरच्या बिहार, पश्चिम बंगाल निवडणुका असोत की इतर कुठल्याही निवडणुका 'रेवड्या' वाटूनच निवडणुका जिंकल्यात. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेने राज्याची अर्थव्यवस्था मोडकळीला आणली. महिलांना सक्षम करायचे सोडून त्यांना तुटपुंजे पैसे द्यायचे आणि ते पैसे महागाईच्या रुपाने पुन्हा काढून घ्यायचे. देशाची आणि राज्याची अर्थव्यवस्था जर नाजूक झाली आहे तर या रेवड्या वाटू नका, असे पंतप्रधान ठामपणे सांगणार आहेत का?

पेट्रोल, डिझेलच्या वापरात काटकसर करा, असे पंतप्रधान सांगतात. ठीक आहे. मग हे आत्ताच का सुचलं? पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, केरळ आणि इतर राज्यांच्या निवडणुकीत प्रचार, रोड शो करताना आणि देशभरातून लाखो माणसे त्या त्या राज्यात नेताना जे कोट्यवधी लिटर्स पेट्रोल, डिझेल वाया गेले तेव्हा का नाही सुचले ? या राज्यांमध्ये जो अफाट पैशाचा खेळ करून मतदान मिळवले तेव्हा का नाही सुचले? लोकांनी परदेशात जाणे टाळावे असे पंतप्रधान म्हणतात. पण किती टक्के लोकांना परदेशात जाणे आत्ता परवडत आहे ? ज्या वर्गाला परवडू शकतो त्यांना पुढच्या महिन्यात आपली कंपनी आपल्याला कामावर ठेवेल का याची खात्री नाही. विद्यार्थ्यांना परदेशात शिकायला जावेसे वाटते कारण गेल्या १० ते ११ वर्षांत आपण शिक्षणात फार मूलभूत गुंतवणूक पण केली नाही भारतात रहावे असे वाटावे, असे वातावरण पण निर्माण केले नाही. शिक्षणात फक्त हिंदी कशी लादता येईल याकडे सगळे लक्ष लागलेले.


गेले काही महिने विदेशी गुंतवणुकदार भारतीय शेअर बाजारातून अंग काढून घेत आहेत. एक अंदाज असा आहे, जवळपास दीड लाख करोड रुपये गेल्या तीन महिन्यात विदेशी गुंतवणुकदारांनी काढून घेतलेत. भारतात विदेशी गुंतवणूक होत नाही. पंतप्रधान आणि त्यांचे मुख्यमंत्री फक्त गुंतवणुकीचे करार करतात, त्यासाठी थंड हवेच्या देशांत जातात. बरं तिथे जाऊन भारतीय कंपन्यांसोबत करार करायचे मग त्यासाठी स्वित्झर्लंडला काय जायचे? स्वतः पंतप्रधान आता १५ मे पासून ५ देशांच्या परदेश दौऱ्यावर निघालेत, हे दौरे तुम्ही थांबवा आणि मग लोकांना आवाहन करा, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

## शिंदेंच्या ९ नगरसेवकांवर अपात्रतेची टांगती तलवार

■ ठाणे

**दिवा** परिसरातून निवडून आलेल्या शिंदे गटाच्या नऊ नगरसेवकांविरोधात निवडणूक प्रतिज्ञापत्रात कथित चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचा आरोप करत ठाणे न्यायालयात निवडणूक याचिका दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे संबंधित नगरसेवकांचे पद धोक्यात येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रकरणात रमाकांत मढवी, शैलेश पाटील, आदेश भगत, दीपक जाधव, साक्षी मढवी, दर्शना म्हात्रे, अर्चना पाटील, दिपाली भगत आणि स्नेहा पाटील या नगरसेवकांविरोधात निवडणूक याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेत नगरसेवकांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात मालमत्ता, अनधिकृत बांधकामे आणि आर्थिक तपशील पूर्णपणे जाहीर न केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## भाजपा नेते अमित साटमांच्या दौऱ्यात २५ वाहनांचा ताफा



■ मुंबई

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आवाहन केले असतानाही भाजपाचे नेते, पदाधिकारीच या सुचनेचे पालन करत नसल्याचे दिसून येत आहे. भाजपाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्या नालेसफाई पाहणी दौऱ्यात सुमारे २५ वाहनांचा ताफा असल्याचा दावा करण्यात आला आहे.

या ताफ्यात दोन वाहनांचा वापर स्वतः साटम यांच्यासाठी करण्यात आला होता, तर इतर वाहनांमध्ये आमदार, पदाधिकारी, तसेच महापालिका अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होते. हा दौरा मुंबईच्या पूर्व उपनगरात विविध ठिकाणी पार पडला.

एवढ्या मोठ्या ताफ्यामुळे इंधनाचा मोठा वापर होत असल्याची टीका विरोधकांकडून करण्यात येत आहे. देशभरात इंधन बचतीचे आवाहन होत असताना अशा प्रकारच्या घटनांमुळे सरकारी यंत्रणांच्या जबाबदारीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. यावरून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी पोस्ट करत सत्ताधाऱ्यांवर

» पान ७ वर

### मध्यप्रदेशात भाजपा नेत्याचा ५०० गाड्यांचा ताफा

मध्य प्रदेशातील उज्जैन येथील भाजपा नेते ठाकुर सौभाग्य सिंह यांच्या ताफ्यात ५०० वाहने दिसली. मध्य प्रदेश सरकारने त्यांची पाठ्य पुस्तक महामंडळाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक केली आहे. आपल्या पदाचा पदभार स्वीकारण्यासाठी ते उज्जैनहून भोपाळला गेले होते.

## विधान परिषदेच्या १७ जागांसाठी बिगुल
### अधिवेशनाआधी सदस्यसंख्या वाढणार

■ मुंबई

**राज्यातील** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्यानंतर आता विधान परिषदेच्या रिक्त जागांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. पावसाळी अधिवेशनापूर्वीच या निवडणुका पार पडण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, पुढील आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची दाट शक्यता आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील अनेक जागा गेल्या अडीच वर्षांपासून रिक्त होत्या. संबंधित सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतरही निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या. मात्र अलीकडेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्याने आता या प्रक्रियेला वेग आला आहे. नियमानुसार, एखाद्या मतदारसंघात किमान ७५ टक्के मतदारसंख्या उपलब्ध असल्यास विधान परिषद निवडणूक घेता येते. ही अट पूर्ण झाल्यामुळे निवडणूक प्रक्रिया सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विधान परिषदेची एकूण सदस्यसंख्या ७८ असून त्यापैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतून निवडून येतात. सध्या यापैकी १७ जागा रिक्त आहेत व त्यासाठीच निवडणुका होणार आहेत. त्यामध्ये अहिल्यानगर, सोलापूर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, परभणी-हिंगोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, संभाजीनगर-जालना व नागपूर या मतदारसंघांचा समावेश आहे.

## बांगलादेश सीमेवर कुंपणाला मंजुरी! जनगणना तातडीने सुरू

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली काल नव्या सरकारची पहिली मंत्रिमंडळ बैठक पार पडली. या बैठकीत राज्याच्या सुरक्षेशी आणि प्रशासनाशी संबंधित काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. बांगलादेश सीमेलगत कुंपण उभारणीसाठी आवश्यक जमीन सीमा सुरक्षा दलाकडे हस्तांतरित करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. सीमावर्ती जिल्ह्यांतील बदलती लोकसंख्यात्मक परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. यासोबतच, राज्यात दीर्घकाळ प्रलंबित असलेली जनगणना प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे आदेशही देण्यात आले. मुख्य सचिव तसेच भूमी महसूल विभागाला जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया पुढील ४५ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## थोरात-चंद्रकांत पाटलांची भेट
### शैक्षणिक कामांसाठी भेटल्याचा दावा

■ पुणे

**काँग्रेसचे** ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी भाजपाचे मंत्री चंद्रकांत पाटील यांची आज भेट घेतली. ही भेट राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली. या भेटीनंतर तर्क-वितर्कांना उधाण आले. मात्र या भेटीमागे कोणताही राजकीय हेतू नसून ती मतदारसंघातील प्रलंबित शैक्षणिक कामांसाठी होती, असे नंतर दोघांनी सांगितले. थोरात म्हणाले की, कॉलेज, अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच विद्यार्थ्यांशी संबंधित काही प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी ही भेट झाली. हे सर्व प्रश्न सर्वसामान्य आणि विद्यार्थ्यांशी निगडित आहेत. या भेटीला कोणताही राजकीय रंग देण्याचे कारण नाही. आमच्या पक्षात कोणतीही नाराजी नाही आणि आम्ही आमचे काम करत आहोत. चंद्रकांत पाटील यांनीही ही भेट केवळ शैक्षणिक कामांपुरतीच मर्यादित होती. कॉलेजच्या कामासाठी थोरात भेटायला आले होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

## मुंबईतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या छापखान्याच्या पाडकामावर हायकोर्ट संतप्त

■ मुंबई

**मुंबई** येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या ऐतिहासिक बुद्ध भूषण छापखान्याच्या २०१६ मधील पाडकामप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र संताप व्यक्त केला आहे. तक्रार करूनही कोणतीही ठोस कारवाई न केल्याबद्दल न्यायालयाने मुंबई पोलिसांना कडक शब्दांत फटकारले.

न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने मुंबई पोलीस आयुक्तांना स्वतःचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले. दादर येथील हा ऐतिहासिक



छापखाना जून २०१६ मध्ये मध्यरात्रीनंतर पाडला होता. मध्यरात्री असे पाडकाम होणे ही अत्यंत दुर्मीळ बाब असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. मध्यरात्री पाडकाम करणे ही नियमित पद्धत आहे का? याबाबत मुंबई पालिका आयुक्तांना स्पष्टीकरण देण्याचे निर्देश दिले. प्रकाश आंबेडकर यांच्यासह दाखल याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने हे आदेश दिले. याचिकेनुसार, डॉ. आंबेडकर यांनी १९३० मध्ये दादर येथे दोन भूखंड खरेदी करून १९४५ मध्ये छापखाना उभारला होता. विश्वस्त वादातून बनावट स्ट्रक्चरल ऑडिट अहवालाच्या आधारे पालिकेने नोटीस मिळवून पाडकाम केल्याचा आरोप आहे.

## हाताचे चुंबन घेणे म्हणजे 'आदरातिथ्य' नाही

■ मुंबई

**महिलेच्या** हाताचे चुंबन घेणे ही 'साधी गोष्ट' किंवा 'शिष्टाचार' असू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबईतील दंडाधिकारी न्यायालयाने दिला. पंचतारांकित हॉटेलमधील कर्मचारी महिलेचा

### टॅक्सीचालकाला २ वर्षे सक्तमजुरी

विनयभंग व तिचा पाठलाग केल्याप्रकरणी न्यायालयाने टॅक्सीचालकाला दोन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. रॉकी फर्नांडिस असे दोषी टॅक्सीचालकाचे नाव आहे. महिलेचा नंबर मागणे आणि वारंवार तिला अडवणे हा पाठलाग करण्याचा गंभीर गुन्हा आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

नोव्हेंबर २०२३ मध्ये घडलेल्या घटनेप्रकरणी आरोपी रॉकी फर्नांडिसला न्यायालयाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ (विनयभंग) आणि ३५४(डी) (पाठलाग करणे) अंतर्गत दोषी ठरवले. या गुन्ह्यात दोन वर्षांच्या

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

सश्रम कारावासासह १,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. न्यायदंडाधिकारी प्रशांत घोडके यांनी हा निकाल दिला. आरोपीने स्वतः चा बचाव करण्यासाठी केलेला विचित्र युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावला. दक्षिण मुंबईतील पंचतारांकित हॉटेलमध्ये काम करणारी महिला चर्चगेट स्थानकावरून शेअरिंग टॅक्सीने कामावर जात होती. ११ नोव्हेंबर रोजी टॅक्सीत इतर प्रवासी नसतानाही रॉकी फर्नांडिसने महिलेला बसवून घेतले.

इच्छित स्थळी पोहोचल्यावर महिलेने पैसे देण्याचा प्रयत्न केला असता त्याने पैसे नाकारले. तिला 'हॅपी दिवाळी' म्हणत हात मिळवला आणि अचानक तिच्या हाताचे चुंबन घेतले होते. त्यानंतर काही दिवसांनी, २१ नोव्हेंबर रोजी पुन्हा रॉकीने महिलेचा पाठलाग केला आणि मोबाईल नंबर मागत 'तू मला आवडतेस' असे म्हटले होते. या प्रकरणाचा खटला मुंबईतील किल्ला कोर्टात चालला. सर्व उपलब्ध पुरावे आणि सरकारी पक्षाचा युक्तिवाद व महिलेचा जबाब विचारात घेत न्यायालयाने आरोपी टॅक्सीचालकाला विनयभंगाच्या गुन्ह्यात दोषी ठरवले.

## कांदा दरात घसरण शेतकरी हवालदिल



■ नाशिक

**नाशिक** जिल्ह्यातील लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याच्या भावातील घसरण सुरूच असल्याने कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. अवकाळी पाऊस, गारपीट आणि वाढलेला उत्पादन खर्च यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचा संताप मातीमोल दरामुळे वाढत आहे. गेल्या आठवड्यात मनमाड येथे एका शेतकऱ्याने कांदा रस्त्यावर फेकून निषेध व्यक्त केला, तर सटाणा येथे कांद्याला अवघा ५० रुपये प्रति क्विंटल दर मिळाल्याने संतप्त शेतकऱ्यांनी कांद्याने भरलेला ट्रॅक्टर बाजार समिती कार्यालयासमोर उभा करून ठिय्या आंदोलन केले. आज आशिया खंडातील मोठ्या बाजारपेठांपैकी एक असलेल्या लासलगाव बाजार समितीत कमी प्रतीच्या कांद्याला सुमारे ५०० रुपये, तर चांगल्या प्रतीच्या कांद्याला सरासरी १००० ते ११०० रुपये दर मिळाला. मात्र, मनमाड बाजार समितीत लहान कांद्याला प्रति किलो केवळ १ रुपया दर मिळाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सटाणा बाजार समितीतही विक्रीस आलेल्या बहुतांश कांद्याची गुणवत्ता खालावलेली असल्याने व्यापाऱ्यांनी केवळ ५० रुपये प्रति क्विंटल दर दिला.

## माऊली-तुकोबांपेक्षा मनू श्रेष्ठ! भिडेंच्या विधानावर शरद पवार गट आक्रमक

■ पुणे

**शिवप्रतिष्ठान** हिंदुस्थानचे अध्यक्ष संभाजी भिडे यांच्या 'मनू हा संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्यापेक्षा श्रेष्ठ होता' या विधानावर शरद पवार गटाने तीव्र संताप व्यक्त केला आहे. संतांच्या परंपरेचा अपमान करणाऱ्या अशा वक्तव्यांवर गप्प बसणार नाही, असा इशारा शरद पवार गटाने दिला आहे.

संभाजी भिडे यांनी काही दिवसांपूर्वी मनू हा संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांच्यापेक्षा श्रेष्ठ होता असे विधान केले होते. त्यांच्या या विधानावर भाष्य करताना विकास लवांडे म्हणाले की, हे संतापजनक आणि आमच्या संतांचा घोर अपमान करणारे विधान केल्यानंतर तरी सुद्धा आम्ही गप्प बसायचे का? संतांच्या भागवत वारकरी संप्रदायातील स्वतः ला साधू किंवा संत म्हणून घेणाऱ्या किती जणांनी याबाबत निषेध किंवा आंदोलन केले? या निषेधार्थ ते २० घुसखोर कधी रस्त्यावर उतरले का? म्हणून मनुवादी हे वारकऱ्यातील घुसखोर ठरतात. सनातन वैदिक धर्म आणि संतांचा भागवत वारकरी संप्रदाय हा संघर्ष पूर्वीही होता आणि आजही आहे. संतांच्या विचाराचे खरे वारकरी आमच्या सोबत येतील.

## भोंदू अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकरांना ईडीचे समन्स

■ नाशिक

**राज्य** महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने समन्स बजावले आहेत. याच आठवड्यात चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश त्यांना देण्यात आले आहेत. दोन दिवसांपूर्वीच विशेष तपास पथकाने चाकणकर यांची सहा तास चौकशी केली होती. या चौकशीनंतर आता ईडीकडून समन्स बजावण्यात आल्याने त्यांच्यावरील तपासाची व्याप्ती वाढल्याचे मानले जात आहे.

या प्रकरणातील आर्थिक व्यवहार आणि मनी लॉन्ड्रिंगच्या अनुषंगाने ईडीकडून तपास सुरू आहे. याआधीही या प्रकरणात चाकणकर यांच्या बहिणीची चौकशी करण्यात आली होती. सध्या ईडी विविध संबंधित व्यक्तींची चौकशी करत असून आर्थिक व्यवहारांची सखोल छाननी सुरू आहे. दरम्यान शिर्डी जमीन फसवणूक प्रकरणात आज अशोक खरातची पत्नी कल्पना खरातच्या अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने तहकूब केली आहे. राहाता येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळल्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

## राज्यात इंधन तुटवडा! महामार्गावरील पंप कोरडे

**मुंबई-गोवा महामार्ग वर सीएनजीनंतर आता पेट्रोल आणि डिझेलचाही तुटवडा निर्माण झाला आहे. नागोठणे ते खेड यक्ष्यातील अनेक पेट्रोल पंपांवर इंधन संपल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कोकणात पर्यटनासाठी आलेल्या प्रवाशांचीही मोठी गैरसोय होत आहे.**




■ अलिबाग

**महामार्गावरील** अनेक पंप कोरडे पडल्याने वाहनचालकांना लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहेत. परिणामी प्रवासात विलंब होत आहे. सांगली, कोल्हापूर, सातारा आणि रत्नागिरी या जिल्ह्यांतही पेट्रोल-डिझेल टंचाईचे चित्र आहे. मिरज डेपोतून होणारा पुरवठा घटल्यामुळे ही परिस्थिती उद्भवली असल्याचे सांगितले जात आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियम या तेल कंपन्यांनी गेल्या दोन महिन्यांपासून उधारीवरील इंधन पुरवठा बंद केला आहे. पेट्रोलच्या तुलनेत डिझेलचा खप अधिक असतानाही, मागणीच्या तुलनेत डिझेलचा पुरवठा कमी असल्याची तक्रार पेट्रोल पंपचालकांनी केली आहे.

## बंगालमध्ये एसआयआर राबवणारे अधिकारी राज्याचे मुख्य सचिव झाले

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमध्ये एसआयआर म्हणजे विशेष सखोल मतदारयादी पुनरावलोकन प्रक्रिया राबवणारे अधिकारी मनोज अग्रवाल यांची राज्याचे नवे मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच निवृत्त आयएएस अधिकारी सुब्रत गुप्ता यांची मुख्यमंत्री सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तेही एसआयआर प्रक्रियेदरम्यान निरीक्षक म्हणून कार्यरत होते.

मनोज अग्रवाल यांच्या देखरेखीखाली विधानसभा निवडणुकांपूर्वी एसआयआर प्रक्रिया राबवण्यात आली होती. या प्रक्रियेत सुमारे ९१ लाख मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या निर्णयावरून राजकीय वातावरण तापले असून काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. काँग्रेसचे महासचिव जयराम रमेश यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर टीका करत म्हटले की, या नियुक्त्या निवडणूक आयोग आणि भारतीय जनता पक्ष यांच्यातील उघड मिलीभगत दर्शवतात. त्यांच्या मते, निवडणूक प्रक्रियेत पक्षपातीपणा करून भाजपाला फायदा मिळवून देण्यात आला. निवडणूक काळात सुमारे २७ लाख लोकांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आले आणि ही प्रक्रिया जाणूनबुजून राबवण्यात आली.